# माणूस



यांच्या
ऋणातून
मुक्त
होण्याकरता

२ मार्च १९६८
चाळीस पैसे

समग्र साप्ताहिक

# माणूस

वर्ष : सातवे : अंक : चाळीसावा

वार्षिक वर्गणी : वीस रुपये

परदेशची वर्गणी : चाळीस रुपये

संपादक

श्री. ग. माजगावकर

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

स. न. फेब्रु. २२

'माणूस'चा संचलन विशेषांक उद्बोधक वाटला. त्याची सूचना मिळाल्यापासून जी उत्कंठा दाटली होती तिची पूर्ती झाली. विशेषत: श्री. पुंडलिक यांचे संचलनाच्या 'पहिल्या दिवसाचे चित्र व श्री. आप्पासाहेब पाटील याच्या प्रेरणेमुळे स्वावलंबी बनलेल्या दोन गावासंबंधी श्री. शिंदे यांनी दिलेली माहिती, हे दोन्ही लेख फार आवडले. 'शेतीकडे मी असे आणि इतके कधी पाहून घेतले नव्हते' हे मनमोकळेपणाने श्री. पुंडलिक यांनी कबूल केले, त्यामुळे लेखाचा शेवट तर कलात्मक व हृदयंगम झालाच शिवाय आज आम्ही बुद्धिजीवी लोक 'असे व इतके' देखील शेतीकडे बघत नाही, हेही नव्याने जाणवले. बाकी या अंकामुळे संचलनाची-शब्द–चित्रमय 'कॉमेंट्री'च कळली–दिसली. माझ्यासारख्या ज्यांना संचलनात विविध अडचणीमुळे सहभागी होता आले नाही, अशा व्यक्तींना या अंकामुळे थोडा दिलासाहि मिळाला.

शरद काळे

खारेपाटण

मूल्य चाळीस पैसे

४१९ नारायण

पुणे २


दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. कल्पित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

# ३

## ऋणमुक्तीचा शुभारंभ

जे ऋण कधीही फिटले जाणार नाही,
पण निदान ज्याची ओळख, आठवण तरी राहावी.
दोन वर्षांपूर्वीची घटना.
महाराष्ट्रात सर्वत्र दुष्काळ.



नेहमीप्रमाणे गाजावाजा फार
पण दुष्काळनिवारणाचे प्रत्यक्ष काम कमी.
या वेळी गाजावाजाची हद्द झाली.
भारतातील इतर प्रांतांतूनच नाही,
जगातील इतर देशांकडूनही मदत आली.
मदत घेतानाची मंत्रिमहोदयांची छायाचित्रेही
वृत्तपत्रांतून झळकली.
एक मदत मात्र महाभयंकर होती.
ती देणाऱ्याने अशा क्रूर पद्धतीने का गोळा केली
हे एक कोडेच होते, अजूनही आहे.
पण घेणाऱ्याने ती घ्यावी
ही निर्लज्जपणाची कमाल होती.
आमच्या नैतिक ऱ्हासाची परमावधी होती.
मदत देणाऱ्या देशाचे नाव होते हॉलंड.
या देशातील लहान मुलांनी एक दिवस उपवास केला
आणि बचत झालेले अन्न, पैशाच्या रूपाने
महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्तांसाठी पाठवून दिले.
धर्मगुरूंनी ठरलेल्या दिवशी हॉलंडभर सकाळी चर्चेसमधून घंटा वाजवून महाराष्ट्रातील अन्नान्नदशा मुलांना आणि त्यांच्या आई–वडिलांना ऐकवली आणि उपवासाचे आवाहन केले. ती लहान अश्राप बालके, ते छोटे छोटे गोजिरवाणे चेहरे दिवसभरच्या उपवासाने कोमेजले, सुकले, नाही, आम्हीच सुकवले.


तरीही इकडे आमचा मराठी बाणा
ताठपणात यत्किंचितही कमी पडला नाही.
जय महाराष्ट्र ! जय भारत !
औरंगाबादच्या सभेत श्री. ग. मा. यांनी दोन वर्षांपूर्वी घडलेली ही घटना सांगितली आणि परतफेड म्हणून नाही, तर पापक्षालन म्हणून एका उपक्रमाचेही सूतोवाच केले.


अन्नसंचलन यापुढे ज्या ज्या गावी जाईल त्या त्या गावी, सुमारे

तासभर संचलन सैनिक गावातील सोनखत गोळा करतील. गावात या खताचा लिलाव होईल. या लिलावातून जमलेल्या पैशांचा हॉलंडच्या मुलांना खाऊ पाठविला जाईल.'

सभेनंतर रात्री साहित्य परिषदेत संचलन सैनिकांमध्येच या कार्यक्रमावर घनघोर चर्चा. 'आपण अन्नस्वावलंबनाचे महत्त्व सांगणार; त्या दृष्टीने आज वाया जात असलेल्या या खताकडे गावकऱ्यांचे लक्ष वेधण्यासाठी हा विधायक उपक्रम उत्तम. पण हॉलंडच्या मुलांच्या भेटीसाठी याचा संबंध नको–' सर्वसाधारण सूर.
"पाहू या." – श्री. ग. मा.

नक्षत्रवाडीच्या रस्त्याला लागण्यापूर्वी कोपऱ्यावर देवडाजींची व तेथेच असलेल्या श्री. दामोदरदासजी मुंदडा यांची भेट घ्यावी म्हणून संचलन सैनिक बंगल्यात शिरले तो तेथे स्वागताची जय्यत तयारी! स्वागतात एका वस्तूची भेट नवीन होती– खराटा. "हा आम्ही 'लक्ष्मी' म्हणून पूजतो" – श्रीमती देवडाजी.
आदल्या दिवशीच्या सभेतील हॉलंडच्या बालकांची कथा ऐकून देवडाजींची सुविद्य कन्या कु. चंदाबेन व त्यांच्या काही सहेल्या यांनी आपापसांत खाऊसाठी निधी गोळा करण्याचा विचार सभेनंतर लगेच प्रकट केला होता व संचलन सैनिकांसाठी काही सफाई साहित्यही येथे तयार ठेवले होते.
अक्राणीची गिरिजन मंडळी तेथेच श्री. दामोदरदासजींजवळ थांबली. ती सर्व परतणार होती. औरंगाबादची नवी दोन-चार मंडळी संचलनात दाखल झाली. आणि संचलन पुढे निघाले.





### कामगारांसाठी थोडा वेळ

वाटेतच रस्त्यालगतच्या एका कारखान्याचे आग्रहाचे आमंत्रण आले. चहापान झाल्यानंतर व्यवस्थापक श्री. करकरे व इतर दोन-चार कर्मचारी मैलभर चालत संचलनासोबत राहिले. आपली ॲम्बॅसेडर पुढे पाठवून संचलन पोचण्याची नक्की वेळ त्यांनी पुढच्या मुक्कामाला कळविली.

### नक्षत्रवाडी

मुक्काम फक्त अर्धा तास. तरीही गावचे तरुण सरपंच श्री. विजयवन्त त्रिवेदी (डावीकडून दुसरे) यांनी खूपच आगतस्वागत केले. नक्षत्रवाडीचा निरोप घेऊन संचलन बोकुड-जळगावकडे निघाले.



दिंडीने वाजतगाजत गावात प्रवेश केला. बोकुड–जळगाव येथील हा नवीन अनुभव होता– मनाचा थरकाप उडविणारा– वाढत्या जबाबदारीची सैनिकांना पावलोपावली जाणीव करून देणारा.

मुक्कामाच्या ठिकाणापाशी शिस्तीने उभ्या असलेल्या मुलांनी एकच गदारोळ उठवला. 'आम्ही मूकबळी होऊ, भीकबळी होणार नाही.'

छे: छे: या मुलांवर भीकबळी तर नाहीच पण मूकबळीसुद्धा होण्याची पाळी येता कामा नये.

पण या मुलांना शाळा बुडवून तर येथे आणण्यात आले नव्हते ना! तसे असेल तर ही स्वागताची प्रथा थांबवली पाहिजे.

रात्रीच्या सभेत हॉलंडच्या मुलांचा विषय–

'उद्या सकाळी पुढच्या गावी जाण्यापूर्वी सोनखत गोळा करण्याच्या आमच्या कार्यक्रमाला परवानगी असावी.'

श्री. बबनराव कुलकर्णी यांनी अध्यक्षीय समारोपात सांगितले, 'सोनखताचे महत्त्व निदान या गावाला तरी पटलेले आहे. यंदाच गावात संडास बांधण्याची योजना आहे. ती आता नक्की पुरी केली जाईल. आम्हीही आता सैनिकांपैकीच एक आहोत. गावातर्फे हॉलंडच्या मुलांना खाऊसाठी आम्ही एकावन्न रुपये जाहीर करतो. सैनिकांनी खत गोळा करण्याचा कार्यक्रम आमच्यावर सोपवावा' बबनरावांचा शब्द म्हणजे गावाचा शब्द होता.


दोन वर्षांपूर्वी भारत-पाक युद्धाच्या वेळी बबनरावांनी गावाला सांगितले, 'परकीय धान्य–अमेरिकन गहू–गावात येता कामा नये,' आणि गावाने बबनरावांचा हा शब्द खाली पडू दिला नाही. गावात गव्हाची लागवडच नव्याने सुरू झाली, आता खूप गहू येथे पिकतो.

संचलन सैनिकांनीही गावाने दिलेली खाऊची भेट तूर्त गावाजवळच ठेवण्याचा निर्णय केला आणि दुसऱ्या दिवशी सकाळी पुढे कूच केले.

ब्रिडकीनचे नाव खूपच ऐकून होतो. पुण्याला असतानाच येथून एक पत्र आले होते– ' आपण या भागात ज्या विशेष विचारांची जाणीव करून देण्यासाठी येत आहात त्यामुळे लोकांत बरेच औत्सुक्य निर्माण झाले आहे. आपल्या या प्रयत्नात आम्हालाही सहभागी होण्यास आनंदच होईल. '

पत्रलेखक होते येथील श्रीसरस्वती भुवन विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. भा. बा. आर्वीकर.

पत्राच्या भाषेवरून कल्पना होती, ही एक भारदस्त आणि प्रौढवयस्क व्यक्ती असणार. प्रत्यक्षात पंचविशीच्या आसपासचा उत्साही तरुण. ते स्वतः आणि विद्यालयातील त्यांचे सात-आठ सहकारी शिक्षक म्हणजे शाळेच्या आणि विद्यार्थ्यांच्या हितासाठी अहोरात्र धडपडणारा एक आदर्श मित्रमेळाच आहे. या मित्रमेळ्यात कुणी समाजवादी विचारांचे आहेत, कुणी जनसंघीय तर कुणी सर्वोदयी. ' जय जगत् ' आणि ' जय भारत ' वर येथे नेहमी हमरीतुमरीची चर्चा. पण कटुता कुठेही नाही. वातावरण आनंदी, खेळीमेळीचे, उत्साहाचे. यांनीच कार्यक्रमाची सर्व जबाबदारी उचलली आणि गावाने एकमुखाने साथ दिली.



पुढे जाण्यापूर्वी एका 'सोनेरी शिवारात' श्री. बबनराव कुलकर्णी (मध्यभागी) व इतर



**बिडकीनच्या वेशीवरील समुदाय !**

त्या कमानी, पंचारती, तुताऱ्या आणि वाद्ये ! दिंडी तरी केवढी लांबवर उभी आहे ! भीकबळी–मूकबळी शिवाय गाव-कऱ्यांनीही काही नवीन घोषणा तयार केल्या होत्या.

मिरवणुकीला निवासापर्यंत पोचायला तासभर तरी लागला असेल.

दुपारी विद्यार्थ्यांसाठी एक छोटासा कार्यक्रम.

संध्याकाळी निवडक मंडळींशी चर्चा.

रात्री जाहीर सभा.

## सभेतील प्रमुख वक्ते होते डॉ. बापूसाहेब काळदाते

आसपासच्या गावांतूनही सभेसाठी शेकडो लोक आलेले होते. बापूसाहेबां-सारखा करडा वक्ता. बिडकीनसारखे जागरूक गाव. सभा रमली, रात्री बारा-पर्यंत रंगली.

येथेही सफाई कार्यक्रम नाही. निधीचा आकडा मात्र रुपये एकशे एक. हाही निधी तूर्त गावकऱ्यांपाशीच ठेवण्याचा संचलन सैनिकांचा निर्णय.


पुढे ढोरकीन आटपून श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या जन्मगावाचे दर्शन घेण्या-साठी संचलन थोडे आतल्या बाजूस— राहाटगावकडे— वळले.





जाताना वाटेतच एकनाथराव राजळे (टाकळी) ह्यांच्या गुऱ्हाळावर

राहाटगाव येथील कार्यक्रम संपल्यावर सर्व मंडळी कॅमेऱ्यासमोर



## मुक्काम पैठण

गोपाळराव जहागिरदार—कॉंग्रेसचे एक जुने कार्यकर्ते—यांनी पैठणला सर्वांचे स्वागत केले.

तीन दिवस केव्हा उलटले ते समजलेच नाही. नगरची इतिहास परिषद आटपून प्रा. पंढरीनाथ रानडे मुद्दाम संचलन —कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी एक दिवस येथे थांबले होते. त्यांच्या-सारख्या सातवाहन कालावर भाळलेल्या अभ्यासकाला एवढ्या थोड्यावेळात किती सांगू, किती दाखवू असे न झाले तरच नवल !

रानडे औरंगाबादला रवाना होतात न होतात तोच येथील एक प्रसिद्ध इतिहासप्रेमी श्री. बाळासाहेब पाटील यांनी आपला ऐतिहासिक वस्तूंचा खजिना बाहेर काढलाच !

महानुभावांच्या मठातून तर पायच निघेना. आणि ती नारसिंहाची आणि लक्ष्मीनारायणाची सुंदर मूर्ती. उगीच नाही श्री. बाबासाहेब पुरंदरे या मूर्ति-सौंदर्याचा आपल्या व्याख्यानातून नेहमी आवर्जून उल्लेख करीत.

आणि नाथांची छाया तर साऱ्या पैठण-वर एखाद्या वटवृक्षासारखी पसरली आहे. श्री. गोपाळराव जहागिरदार कोपरा न् कोपरा दाखवीत होते—

नाथांची कुचाळकी करणारे ब्राह्मण बसत होते तो हा पार, यवन पुनः पुन्हा थुंकला आणि नाथांनी पुनः पुन्हा स्नान केले ती ही जागा, वेश्येचा उद्धार, महाराच्या मुलाला तापलेल्या वाळ-वंटात कडेवर घेतले ती जागा.

पैठण तीन दिवसांत पाहून होणे अवघड होते. कारण इतर कार्यक्रमांची गर्दीही चालूच होती.

विद्यार्थी-प्राध्यापकांशी चर्चा, व्यापारी समाजाशी विचारविनिमय, महिला मंडळ भेट, इत्यादी.



**आपेगावला एक रात्र मुक्काम करून संचलन पैठणच्या वेशीवर पोचले.**



**श्री. दामोदरदासजी मुंदडा**

यांनी संध्याकाळी झालेल्या जाहीर सभेत १९५१ मध्येच विनोबाजींनी पं. नेहरू यांना अन्नस्वावलंबनाबाबत दिलेल्या गंभीर इशाऱ्याची श्रोत्यांना आठवण करून दिली.

## संचलन कार्यक्रम

| | | |
|---|---|---|
| दि. | १ मार्च | जाळी–पिंपळगाव |
| दि. | २ मार्च | कोकणगाव |
| दि. | ३ मार्च | वडगाव |
| दि. | ४ मार्च | संगमनेर |
| दि. | ५ मार्च | नांदूर |
| दि. | ६ मार्च | माळवाडी |
| दि. | ७ मार्च | दोडी |
| दि. | ८ मार्च | गुरेवाडी |
| दि. | ९ मार्च | सिन्नर |

**श्री. शामराव पाटील**

पैठण तालुका पंचायत समितीचे सभापती—

यांनी सभेच्या अध्यक्षपदावरून असा ठराव मांडला— "पैठणच्या नागरिकांची अशी दृढ भावना आहे की, अन्नसंचलनामागील भूमिका योग्य आहे. परान्नावर आश्रितासारखे जगणे घातक आहे. असलेले उत्पादित अन्न नीट राखले आणि सारखे वाटून घेतले तरी बरीचशी अन्नाची तूट कमी होईल. इतके करूनही तूट राहिलीच तर आम्ही सर्वजण आनंदाने सहन करू पण लाचारीचे जिणे यापुढे एक क्षणही सहन करणार नाही." आणि हा ठराव सभेत एकमताने संमतही करण्यात आला.

देवगिरीपासून पैठणपर्यंत प्रत्येक मुक्कामात अशा अर्थाचे ठराव संमत झाले, पण औरंगाबाद सभेत योजलेल्या कार्यक्रमाला पैठणपूर्वी मुहूर्तच सापडू शकला नाही. कुठे वेळेची अडचण, कुठे गावच्या इच्छेचा प्रश्न. नाथांनी मात्र सैनिकांकडून अल्पशी सेवा करवून घेतली हे केवढे भाग्य !



## नाथमंदिराकडे जाणाऱ्या वाटेवर

श्री. दामोदरदासजी मुंदडा
श्री. राजाभाऊ कुलकर्णी

संचलनाला एक नवा आशय आज लाभत होता.
ऋणमुक्तीचा हा एक अल्पसा शुभारंभ होता.

□



# भूमिदानाची आणखी एक संधी !

**दिल्ली दरबार**

आपल्या देशाचा तीनशे–साडेतीनशे चौरस मैलांचा भूप्रदेश पाकिस्तानला द्यावा लागणार असल्यामुळे काही मंडळी भलतीच प्रक्षुब्ध झालेली आहेत. कच्छबद्दल जिनिव्हा येथील आंतरराष्ट्रीय निवाडा मंडळाने जो निर्णय दिला आहे, त्याबद्दल लोकसभेमध्ये श्री. मधु लिमये, श्री. अटलबिहारी बाजपेयी प्रभृतींनी संताप व्यक्त करावा यात काहीही आश्चर्य नाही. बोलून चालून ही विरोधी पक्षाची मंडळी. भारत सरकारचे परराष्ट्रीय धोरण नेभळट आहे हा या लोकांचा नेहमीचाच आक्षेप. त्यामुळे पाकिस्तानला ३०० चौ. मैल प्रदेशाचे भारताने 'भूदान' करावे असा निवाडा मंडळाने सुचविताच विरोधी पक्षातील मंडळी बिथरली जावीत आणि हा राष्ट्रीय अपमान भारत सरकारने सहन करू नये असे त्यांनी बजावावे यात नवल नाही. परंतु श्री. छगला यांच्या सारखा नि:पक्षपाती न्यायपंडितही त्याच सुरात बोलू लागावा हे काही खरे नाही.

राष्ट्रपतींच्या भाषणावर राज्यसभेत चर्चा सुरू असताना छगला यांनी गप्प बसावयास हवे होते. परंतु आंतरराष्ट्रीय निवाडामंडळाचा निर्णय ऐकून त्यांना भान राहिले नाही. श्री. छगला म्हणाले की, "कच्छनिवाडा हा न्यायालयीन निवाडा नसून राजकीय निवाडा आहे आणि म्हणून तो स्वीकारण्याची भारतावर मुळीच जबाबदारी नाही. सबंध कच्छ भारताचा आहे हे सिद्ध करण्याइतका आपल्यापाशी भरपूर पुरावा आहे. निवाडामंडळाने केवळ कायद्याचा विचार केला असता तर आपली भूमिका मान्य झाली असती." छगला महाशय एवढे बोलूनच थांबले नाहीत. ते पुढे असेही म्हणाले की "आंतरराष्ट्रीय न्यायालयाकडून न्याय मिळविण्याचा प्रयत्न केला की, कसा फटका खावा लागतो याचा प्रथम आपण काश्मीरबाबत आणि आता कच्छबाबत अनुभव घेतला आहे. या सर्व गोष्टींवरून एकच निष्कर्ष निघतो की, राष्ट्राराष्ट्रातील प्रश्न सोडविताना अखेरीस आपल्याला आपल्या सामर्थ्यावरच अवलंबून राहावे लागते."

छगला यांच्यासारख्या न्यायपंडिताने कच्छनिवाडा स्वीकारण्याची भारतावर

जबाबदारी येत नाही असे सांगून सामर्थ्याची उपासना करण्याचा आदेश द्यावा. यावरून किरकोळ ३०० चौरस मैलांचा तुकडा देऊन टाकण्याची पाळी येताच आपल्या देशातील विचारवंत किती प्रक्षोभक होतात याचा हा पुरावा आहे. खरे म्हणजे आम्ही किती उदार आहोत हे पाकिस्तानला आणि जगाला दाखवून देण्याची संधी निवाडामंडळाने आणून दिली असताना निवाडा केराच्या टोपलीत फकून द्या, ही भाषा आमच्या ' जय जगत् 'च्या धोरणाशी किती विसंगत आहे याचा या मंडळींना काहीच कसा बोध होत नाही.

टोकियोच्या थंड वातावरणात जागतिक प्रश्नाचा विचार करीत बसलेल्या श्री. जयप्रकाश नारायण यांच्यासारख्या शांतिब्रह्माला छगला, लिमये, वाजपेयी यांच्या वर्तनाचा संताप येणे अगदी साहजिकच आहे. भारतातल्या सर्व राजकीय पक्षांनी आणि लोकांनी हा निवाडा स्वीकारला पाहिजे असे त्यांनी कळकळीचे आवाहन केलेले आहे इकडे छगला प्रभृतींची आव्हानांची आक्रस्ताळी भाषा ऐकू यत असताना टोकियो–स्थित शांतिदूताचे हे आवाहन ऐकून निदान आम्हाला तरी फार बरे वाटले. जयप्रकाशजी म्हणाले की, "कच्छनिवाडा नाकारून भारताची साऱ्या जगात बदनामी होत आहे. ही लहानशी गोष्टदेखील या मंडळींच्या ध्यानात येऊ नये हें पाहून माझ्या अंत:करणाला ज्या वेतना होत आहेत त्या सांगणे कठीण आहे."

## प्रदर्शनाचे भाग्य

श्री. जयप्रकाशजी जॉन्सनला व्हिएटनाममध्ये शांतता प्रस्थापित कर असे सांगण्यासाठी अमेरिकेला जात असताना त्यांच्या मायदेशातच ही असली आव्हानाची भाषा निघणे ही खेदाची गोष्ट आहे. आपले भारत सरकार छगला यांचे बिलकूल ऐकणार नाही अशी आम्हाला आशा आहे. छगला म्हणतात– कश्मीरकरिता आपण सुरक्षा समितीकडे जाऊन फसलेले आहोत. छगलाजी काहीही म्हणेनात, काश्मीरच्या निमित्ताने आपल्याला भूदानाची केवढी संधी हाती आली आणि ती भारत सरकारने किती छानदार रीतीने राबविली, हे ज्याला माहीत आहे त्याला लिमये–वाजपेयी यांच्यासारख्या कांगावखोर विरोधकांच्या आणि छगला यांच्यासारख्या न्यायपंडितांच्या आक्रस्थाळी भाषेमुळे भारत सरकार उगाच काही तरी जोरदार पाऊल टाकेल अशी भीती बाळगण्याचे सुतराम् कारण नाही.

आपण पाकिस्तानला काश्मीरच्या पश्चिमेकडला भाग देऊन टाकला. चीनला उत्तरेकडचा गवताची पानेदेखील न उगवणारा अकसाई चीन देऊन टाकला, आता कच्छमधील तीनशे चौरस मैल देऊन टाकू. भारत हा शांतताप्रिय देश आहे हे जगाला पटवून देण्यासाठी एवढे किरकोळ त्याग करायला आपण आनंदाने तयार असले पाहिजे. इतकेच नव्हे तर भूदान ग्रामदानापासून सुरू झालेल्या चळवळीला ' प्रदेशदाना 'चे भाग्य लाभते आहे हे पाहून आपल्या सर्वांच्या डोळ्यात आनंदाश्रु वहावयास हवेत. गेल्या वीस वर्षांमध्ये आपण किती दाने केली याचा आढावा घेतला की

आपल्या गाठीला किती पुण्य साठले आहे आणि शांतताप्रिय भारताची प्रतिष्ठा आंतरराष्ट्रीय क्षेत्रात कशी विकास पावत आहे हे कळून येते.

कोणी म्हणतात म्हणे राष्ट्राला स्वाभिमान हवा, त्या स्वाभिमानाची किंमत चुकविण्यासाठी कोणत्याही त्यागाला तयार व्हायला हवे. किती संकुचित आणि प्रतिगामी भाषा आहे ही. या मंडळींची उदाहरणे ही. ठराविक आहेत. आपल्या अधिकाऱ्याचा कान कापला म्हणून ब्रिटन म्हणे चीनशी युद्धाला उभे ठाकले. एवढा लहानसा तो उत्तर कोरिया. त्याच्या जालसीमेत अमेरिकेची प्युब्लो बोट येताच परिणामांची पर्वा न करता उत्तर कोरियाने ती बोट अडवून ठेवली. शेवटी ब्रिटन काय किंवा उत्तर कोरिया काय मुळात युद्धखोर राष्ट्र. आमच्यासारखी शांतिप्रमी परंपरा त्यांना कोठे आहे! आपल्या देशाचे भले करण्याच्या नादात या राष्ट्रांनी किती रक्त सांडले! आम्ही असली अघोरी कृत्ये करणार नाही. छाड बेट पाकिस्तानात गेले म्हणून बिघडले काय हेच आम्हाला समजत नाही. सिंधु नदी आपल्याला अंतरली म्हणून हळहळणारे सावरकर आणि आंतरराष्टीय न्यायाच्या नावाखाली छाड बेट आपल्यापासून दुरावत आहे म्हणून व्यथित होणारे छगला– या प्रवृत्ति आमच्या सनातन परंपरेशी विसंगत आहेत हेच तर आम्ही गेली कित्येक वर्षे सांगत आहोत.

परवाच आम्ही एक व्यंगचित्र पाहिले. एका गुंडाने एका स्त्रीची पर्स पळविली. तेव्हा ती स्त्री न्यायाधीशाकडे गेली. न्यायाधीशाने तिची पर्स तिला दिली. परंतु चोराचे श्रम वाया जाऊ नयेत म्हणून त्या पर्समधील सोन्याचा हार चोराला देऊन टाकला. कसा आहे हा न्याय. दोघेही खूष. बाईला आपली पर्स परत मिळाली आणि चोराला त्याच्या श्रमाचे मानधन मिळाले. या दोघांची खुषी पाहून न्यायाधीशाला सात्त्विक समाधान प्राप्त झाले. या व्यंगचित्रकाराने कच्छ निवाडयाच्या संदर्भात हे व्यंगचित्र काढले आहे. हा व्यंगचित्रकार विकृत मनोवृत्तीच असला पाहिजे हे उघड आहे. त्याशिवाय कच्छ–निवाडया संबंधी काढलेल्या चित्रात त्याने पाकिस्तानला चोर दाखविले नसते आणि निवाडामंडळाची संभावित न्यायाधीश अशी संभावना केली नसती.

फ्रँक मोराईस हे सुप्रसिद्ध पत्रकारही या व्यंगचित्रकाराच्याच माळेतील. त्यांनी लिहिले आहे– ‘कोणत्याही आंतरराष्ट्रीय मंडळावर आपण विश्वास ठेवता कामा नये हा या निवाडयावरून आपण धडा शिकले पाहिजे. आपले सामर्थ्य हाच आपल्या स्वातंत्र्याचा आणि अखंडत्वाचा अधार आसतो. इतरांच्या मेहरबानीवर ते टिकू शकत नाही.’ म्हणजे पुन्हा हा छागलांचाच विचार म्हणायचा.

शांतिब्रह्म जयप्रकाशजी व्यथित व्हावेत असाच हा विचार आहे. जयप्रकाशजींच्या व्यथेत आम्हीही सहभागी आहोत हे सुज्ञास सांगणे नलगे.

– सदाशिव पेठकर

# मुक्ता फळे!!

## ☐ देख कबिरा रोया !

मरहूम मौलाना आझाद यांनी आपले गुह्य ज्या आपल्या शिष्यवराला सांगून देह ठेवला, ते प्रा. हुमायून कबीर हे तूर्त कॉंग्रेसमधून बाहेर पडले असले तरी आपल्या गुरूचे कार्य ते सतत करीत असतात. गुरूने सगळी हयात कॉंग्रेसमध्ये गांधी टोपी न घालता काढली, परंतु त्यांनी जे साधले, तेच हे हुमायून कॉंग्रेसबाहेर राहून करीत असतात.

उस्मानिया विद्यापीठ व निजामाचा धर्मादाय ट्रस्ट यांच्या विद्यमाने हैद्राबादला "मौलाना आझाद स्मारक व्याख्यानमालेत" हुमायूनरावांनी नुकतेच जे व्याख्यान दिले, त्याचा सर्व हिंदूंनी नीट विचार केला पाहिजे. विषय होता "अल्पसंख्यांक निधर्मीपणा व लोकशाही." जगातल्या इतर देशांत अल्पसंख्याक असले, तरी त्यांचा निराळा विचार त्या देशात होत नाही. पंडित नेहरूंच्या पुण्याईने या देशात हा विचार यावच्चंद्रदिवाकरौ होत राहावा अशी व्यवस्था करण्यात आलेली आहे.

हुमायूनराव म्हणाले– "वैचित्र्यातून एकता हे तत्त्व जर भारतात प्रतीत झाले तर केवळ भारताचेच प्रश्न सुटणार नाहीत, तर जगाला एक आदर्श वस्तुपाठ घातल्याचे पुण्य भारताला लागून, शिवाय आधुनिक जगातील कठीण समस्या सोडविण्यासाठी या वस्तूपाठाचा उपयोग होऊ शकेल."

मुसलमानांच्या स्वाऱ्या देशावर सुरू होण्यापूर्वीच इथे काय ती वैचित्र्यातून एकता हिंदूंनी निर्माण केली. जैन, बुद्ध जे जे निराळे म्हणून हिंदूंपासून वेगळे झाले, त्यांना हिंदूंनी पुन: या आंतरिक एकतेच्या बळावर पचवून टाकले. परंतु मुसलमानांनी इथे येताच या हिंदुधर्मियांवर सतत आघात सुरू केले. दोघांनी सुखात राहणे शक्य झाले नाही. " Co-existance was broken here and then by forcible Conversions marriage or persecution–" म्हणजे हिंदूंबरोबर सुखाने राहण्याचे नाकारून मुसलमानांनी इथे जबरदस्तीची धर्मांतरे, जबरीविवाह व हिंदूंचा छळ आरंभला असे 'ताया झिटकिन' हिने आपल्या 'भारत' या पुस्तकात नमूद केले आहे.

हिंदूबरोबर सुखाने राहणे नको, आम्हांला पाकिस्तान द्या– अशी मागणी करून मुसलमानांनी फाळणी मागितली व नेहरू–पटेलांनी 'याचि देही याचि डोळा' ती

दिली, तेव्हा आता उरलेल्या भारतात, वैचित्र्यातील एकता प्रगट होण्याचा समय आला हे जाणून इथले सूज्ञ मुसलमान स्वस्थ बसले, असे आपण समजायला मुळीच हरकत नाही ! पाकिस्तानात न गेलेल्या मुसलमानांचे भारतीय जनतेवरील हे उपकार होत. म्हणूनच प्रा. कबीरांसारखी ' रत्ने ' अजून इथे हिंदूंना उपदेश करण्यास उपलब्ध आहेत.

यावरून कुणाची अशी अपेक्षा असेल, की प्रा. कबीर सांगतील की वैचित्र्यातून एकता निर्माण करण्यासाठी, भारतातील मुसलमान हिंदूंच्या मदतीने झालेली फाळणी रद्द करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करतील, तर ते सर्वसामान्य राजनीतीला धरून झाले. परंतु वैचित्र्यातील एकता ' शाबूत ' ठेवण्यासाठी येथील हिंदूंनी कुठले ' ताबूत ' नाचवावेत याचेच प्रमुखतः हुमायूनरावांनी विवेचन केले. ते म्हणाले—

" निधर्मी राज्य हे केवळ अल्पसंख्यांकांच्या हिताचे असते असे नाही तर तेदेशांतील बहुसंख्य जमातीच्या हिताचे असते."

हा नवा पॉइंट आहे ! प्रा. कबीरांनी जर पाकिस्तानात दौरा केला तर हा पॉइंट लोकांच्या नीट ध्यानात येईल.

हा मुद्दा स्पष्ट करताना कबीरसाहेबांनी सांगितले—

" हिंदू धर्म हा एकसंघ नाही. जर भारताने हिंदूधर्म हा राष्ट्रीय धर्म केला तर मग तो वैष्णवपंथीय ? का शैवपंथीय ? का लिंगायत की जैन ? मग या मांडणातून पुन्हा भारताच्या चिंध्या होतील ! म्हणूनच या देशात निधर्मीपणा असणे हिंदूंच्याच हिताचे आहे."

पाकिस्तानातून जेव्हा सर्व हिंदूंची ससेहोलपट झाली, तेव्हा पापस्तानाने— हा वैष्णव की शैव ? लिंगायत की जैन ? स्पृश्य की अस्पृश्य ? असा—पंक्तिप्रपंच केला नव्हता, यावरून मुसलमानांना निधर्मी राज्यसत्तेची मुळीच आवश्यकता नाही हा मुद्दा कबीरांनी का मांडला नाही कुणास ठाऊक ?

" ताया झिंकीन " सारख्या परदेशी स्त्री— इतिहासकारांचे म्हणणे या देशातील वैचित्र्यातील एकता मुसलमानांनी नष्ट केली आहे. परंतु स्त्रीबुद्धी केव्हाही कनिष्ठच होय . बाईलबुद्धी खरी मानायची तर भारतातून यच्चयावत मुसलमानांना पाकवासी केल्याखेरीज या देशाला पुनः एकता लाभण्याची शक्यता नाही ! काहीतरीच लिहायचे म्हणजे काय ?

कबीर म्हणतात तेच बरोबर आहे . जैन, लिंगायत, शैव, वैष्णव, स्पृश्य, अस्पृश्य हा भेद मुसलमान कधीही करीत नाहीत. हिंदूच करतात. त्यामुळे त्यांच्या चिंध्या होण्याची शक्यता आहे. म्हणून इथे निधर्मी राज्यसत्ता असणे हिंदूंच्याच हिताचे आहे. कबीरांचे व्याख्यान सर्व हिंदूंनी मनन करणे हिताचे आहे. यासाठी हुमायुरावांसारख्या वक्त्यांची व्याख्याने सतत भारतात होणे आवश्यक आहे. मौलाना आझादांचे हे खरे स्मारक आणि निजामाचा हाच खरा ट्रस्ट ! !

ज्या दुष्ट माणसांनी प्रा. हुमायूनरावांना पहिल्या दिवशी बोलू न देता दंगल केली त्यांचा आम्ही निषेध करतो. त्यामुळे हिंदूंचेच नुकसान झाले आहे. दोन दिवसांत करायचा उपदेश त्यांना एकाच दिवशी करावा लागला. हिंदूंचे मरण २४ तासांनी अलिकडे आणणाऱ्या या नाठाळांचा गृहखात्याने बंदोबस्त करावा ! प्रा. कवीरांचे विचार पाकिस्तानात फलावण्यासाठी गृहखाते आयुबखानांची परवानगी आणून त्यांना पाकिस्तानात पाठविल तर त्यात कबीरांचा केवळ गौरव नसून तो सर्व भारतवासी हिंदूंचाही गौरव ठरेल.

## □ गीतगौरव

पूर्वी सत्ताधारी राजे व ब्रिटिश राजवटीत संस्थानिक पदरी 'कवी' पाळीत असत. नरेशांची सणासुदीला गीते रचून स्तुती करणे हे प्रमुख काम त्यांना असे. इंग्लंडची राजे-राण्या अजून 'पोएट-लॉरेट' नेमतात. इंग्लंडच्या राणीने नुकताच एक राजकवी नेमला. अर्थात तूर्त या राजकवीला इंग्लंडचे साम्राज्य विल्सनसाहेबाने कसे गुंडाळले हे सांगण्याखेरीज दुसरा काव्यविषय नसल्याने त्याला फारसे काम पडणार नाही. आज भारतात काँग्रेसचे केंद्रिय व प्रांतिक मंत्री चोखपणे राजशकट हाकीत असताना त्यांनी एखादा दरबारी कवी नेमायला मुळीच हरकत नाही. कविवर्य माडगूळकरांना आमदारकी दिली गेली, परंतु निवडणुकीत चार दोन गीते रचण्यापलीकडे त्यांच्या हातून फारसे कार्य झाले नाही. बा. भ. बोरकर हे 'महात्मायान' या निर्मितीत गुंतलेले आहेत. कुसुमाग्रज सत्ताधीशांची स्तुती करण्याकरिता 'प्रतिभा' झिजवणार नाहीत असा समज आहे. वेश्येच्या वेणीतील मोत्यांचा तुरा किंवा जनतेच्या पोटातील भुकेचा सुरा ह्यांचे वर्णन करणारा कवी या कामासाठी काय कामाचा ! परंतु काँग्रेसी मंत्र्यांना भासणारी ही उणीव भरून काढणारा एक कवी नुकताच आमच्या वाचनात आला. पहिल्याच फटक्यात तो डौलदार पुरुषसिंह उभा करतो–

"जेव्हा मुलायम इस्त्री केलेली पांढरी टोपी–
  किंचित तिरपी ठेवून हिकमती डोक्यावर
चार पावले टाकतो हा पुरुषसिंह,
  तेव्हा रस्ते टरकतात;
हातभट्टीवाल्यांचे गणवेशधारी आश्रित
  याला सलाम ठोकतात पॉलिश केलेला
मग आणखी चार पावले टाकतो हा पुरुषसिंह,
  हायड्रोसिल झाल्यागत भासणाऱ्या प्रमत्त डौलान."

वारेवा ! पुरुषसिंहाच्या अंगात पाणी आहे हे हायड्रोसिलच्या सूचक उल्लेखाने कवी सांगून जातो.

ह्या पुरुषसिंहाची जनमानसावरील पकड वर्णन करताना तर कवीने बहार केलेली आहे–

“ विकत घेण्याचे सामर्थ्य जाणतो पुरुषसिंह.
तीही त्याच्या पोलादी मंत्राची तरबेज ताकद.
अनुभवी गिऱ्हाइकाने टिचकी मारून
ओळखावे नारळातले पाणी
तशी ओळखतो हा एकाच नजरेने
हरेक विचारवंताची अचूक किंमत.”

टिचकी मारून दुसऱ्याचे पाणी जोखले की दातृत्वाची पिचकारी हा कशी सोडतो ते कवी सांगतो––

“ चार सुजाण विचारवंतांना यानेच चिकटवले
संपादक म्हणून दोन हजार रुपयांवर
आणि अलवत्याला देऊन टाकले
वैचारिक सेमिनार भरवण्याचे घाऊक कंत्राट,
जडजंबालाचार्य जुन्नरकर शास्त्र्यांना
लावून दिली आठ वार्षिक धोतरे –

विचार हा पाऱ्यासारखा चंचल असतो. असे विचार सतत करणाऱ्या विचारवंतांना ‘ चिकटवणे ’ किती कठीण ! अलवत्याकडून सेमिनार भरवून घ्यायची म्हणजे काय कमी कर्तृत्व झाले ? – आणि शास्त्रीबुवांनाच धोतरे दिली अशाकरिता की सर्व लायक-नालायक ब्राह्मणांचा प्रतिपाळ छत्रपतिप्रमाणे इथे अभिप्रेत नाही. प्रतिपाळ आहे तो फक्त शास्त्र्यांचा! स्थलाभावी संपूर्ण कवितेचा परामर्श घेता येत नाही.

हा सर्व गीत–गौरव अचूक साधला आहे मंगेश पाडगावकरांनी. ‘ सत्यकथे ’च्या फेब्रुवारी अंकातली त्यांची ही कविता वाचताच आमची खात्री झाली की “ पुरुषसिंहा”–प्रमाणेच ते “ झेड्.पी. गौरव”, “हातभट्टी गौरव”, “ग्रामगौरव”, “ पंचायत गौरव ” लिहितील तर ‘ विकत घेण्याचे सामर्थ्य असलेला ’ एखादा पुरुषसिंह त्यांचीही मूठ ‘ अर्थपूर्णरीत्या बंद केल्याशिवाय ’ राहणार नाही.

**– ग्यानबा**



समीर

# विचार वारे

## ☐ नगर-रचना कशी असावी ?

नगर-रचनाशास्त्रावर भाषण देण्यासाठी पोलंडचे एक तज्ज्ञ डॉ. मिमोय झारेंबा हिंदुस्थानात आले होते, ते म्हणाले, “शहरांची वाढ निश्चित ठरवून दिलेल्या मर्यादेच्या आतच व्हायला हवी ही पारंपरिक कल्पना आता अगदीच जुनाट ठरली आहे.” शहरांचा आराखडा आखताना भविष्यकाळाकडे लक्ष ठेवणे अवश्य आहे. शहराकडे जाणाऱ्या लोकांचा लोंढा वाढत चालला असल्याने नगर-योजनाकाराला सर्वांची गरज भागविण्याकडे लक्ष पुरविले पाहिजे. “आदर्श उपाय-योजना म्हणजे गावांच्या जवळच लहान-लहान शहरे वसवावीत, म्हणजे प्रत्येकाला शहराकडे धाव घ्यावी लागणार नाही व मग शहरात नाना प्रकारच्या समस्या निर्माण होणार नाहीत.”

हिंदुस्थानात नगर-रचनेचे कार्य अधिक सोपे व्हायला हवे. भारतातील खेड्यांची पारंपरिक रचना “फारच उत्कृष्ट” आहे. याच खेड्यांतून व लहान गावांतून आधुनिक सुधारणा घडवून आणणे योग्य होईल. यासाठी संशोधनाची आवश्यकता आहे. “हिंदुस्थानातल्या गावांची रचना येथील परिस्थितीत उत्कृष्ट अशीच आहे. हा देश इतका विस्तृत आहे व निरनिराळ्या भागांतल्या हवामानांत इतका फरक आहे की येथील नगर-रचना प्रादेशिक स्वरूपाची असणे साहजिक आहे.”

मागासलेल्या देशांत नगर-रचना कशी करावी हे पाहण्यासाठी बऱ्याच आशियाई व आफ्रिकन देशांचा दौरा करून आलेले झारेंबा म्हणाले : “प्रत्येक देशाच्या ग्रामीण विकासात अत्यंत पारंपरिक व तितकेच वास्तववादी असे काही तरी आहे. त्याचे जतन झाले पाहिज व त्यात शक्य तेवढी सुधारणा केली पाहिजे.”

## ☐ आजची ब्रिटिश तरुण पिढी

ब्रिटनमधील आजची तरुण पिढी अस्वच्छ, व्यसनी आणि व्यसनासक्त आहे असा गवगवा होऊ लागला आहे, पण खरोखरीच ती तशी नाही हे जगाला सांगण्यासाठी एका ब्रिटिश वर्तमानपत्राने मायकेल गिवन्स या १९ वर्षांच्या कॉलेज-युवकाची व मॅट्रिशिमा ग्रिम्शॉ या १८ वर्षांच्या शालेय विद्यार्थिनीची निवड करून त्यांना जगाच्या दौऱ्यावर पाठविले. ही जोडी काही दिवसापूर्वी दिल्लीला येऊन गेली तेव्हा त्यांनी ब्रिटनमधील बरीच तरुण मुले-मुली विचित्र का वागतात याची थोडीशी कल्पना दिली.

साधारणपणे कुठल्याही देशातल्या तरुण पिढीला पूर्वीच्या पिढीप्रमाणे दिसावे, वागावे किंवा विचार करावा असे वाटत नाही. ब्रिटिश तरुणांत ही भावना विशेष प्रबळ आहे. ब्रिटनमध्ये अजून "क्रुद्ध तरुणां"चे युग चालू आहे. अन्याय, हुकुमशाही, क्रौर्य, या गोष्टींचा या तरुणांना अत्यंत राग आहे, व ही परिस्थिती बदलण्यासाठी काही तरी केले पाहिजे असे वाटायला लावण्याइतका हा राग कार्यक्षम आहे.

ब्रिटनच्या तरुण पिढीला नेहमी सांगण्यात येते की तुम्हांला विध्वंसाखेरीज दुसरे काहीच दिसत नाही. "परंतु आम्हांला बाहेर झेप घ्यावीशी वाटते, आमच्यात साहस आहे व मानवतेचे रक्षण करण्यासाठी आम्हीही तत्पर आहोत." ब्रिटनमध्ये तरुणांसाठी खास संस्था व समाजसेवा शिबिरे आहेत आणि "आम्ही साहित्या-पासून बाँबपर्यंत सर्व आंतरराष्ट्रीय समस्यांचा विचार करतो." मादक द्रव्यांचे सेवन काही तरुणांत पसरले आहे, पण ज्यांना जीवनाचा उबग आला आहे ते एक प्रकारची सुटका म्हणून ही द्रव्ये घेतात. "हिप्पी"वाद ब्रिटनमध्ये जसा पसरला तसाच संपुष्टात आला. परंतु या मंडळींना खरोखरीच निराळे जीवन जगण्याची इच्छा होती. एकूण पाहता सर्व जगातली तरुण पिढी एकाच प्रकारची आहे, फक्त त्यांच्या वृत्तीत फरक आहे एवढेच. उदाहरणार्थ, ऑस्ट्रेलियातील 'अभिनव मत-वादी' तरुण मंडळी आपल्या मनांतील कोलाहलाला निरनिराळे खळ खेळून मोकळी वाट करून देत आहेत. ◻


# फॉस्फोमिन:

## अधिक उत्साह देते. भूक वाढविते.


## जोम वृद्धिंगत करते. शरीराची रोग-प्रतिकार-क्षमता वाढविते
खरोखर!...



**फॉस्फोमिन म्हणजे घरकुलांतील आरोग्याचे कारंजे!**

व्हिटॅमिन बी कॉम्प्लेक्स आणि विविध ग्लिसरोफॉस्फेटस्‌युक्त उत्तम फलास्वाद असलेले हिरव्या रंगाचें टॉनिक—फॉस्फोमिन

SQUIBB® TTT®

® हा ई. आर. स्क्विब ॲण्ड सन्स इन्कॉर्पोरेटेड, यांचा रजिस्टर्ड ट्रेडमार्क आहे व करमचन्द प्रेमचन्द प्रायवेट लि. यांना तो वापरण्याचे लायसन्स आहे

SARABHAI CHEMICALS


Shilpi SC 50 A/67 Mar



# सौंदर्यवेडी स्टेला स्नेड

एक मड्डम आहे. तिचे नाव स्टेला स्नेड. वयाने ती मावशी, आत्या वगैरे शोभण्याइतकी चांगली भारदस्त आहे. पण मनाने फार छोटी, चळवळी, खट्याळ आणि नादी आहे. पूर्वी ती लंडनमध्ये होती. आता मुंबईनजीक जुहूच्या सागरी परिसरात आहे. हिला पुतळे करता येतात, चित्रे काढता येतात आणि फोटो घेता येतात. परंतु याहूनही महत्त्वाचे हे की हिला जगाकडे, या सृष्टीकडे तुमच्या- माझ्याहून एका वेगळ्या दृष्टीने पाहता येते. वेगळ्या दृष्टीची माणसे कधी तत्त्वज्ञ असतात. कधी क्रांतिकारक असतात. कधी नुसतीच विक्षिप्त असतात. स्टेला स्नेड सौंदर्यवेडी आहे. पण सुंदर सुंदर चेहरे, सूर्योदय, सूर्यास्त, ढग, अर्भके, झाडे, फुले यांतले सौंदर्य तिला वेडे करीत नाही. हे असले सौंदर्य तर तुम्हालाही थोडे-फार वेड लावते. (वेडे व्हायला आपल्याला सवड नसते हे सोडा!) पण स्टेला स्नेडबाईला

। रा । त । रा । णी ।



**प्रतिबिंब**

सौंदर्य दिसते ते शिंपल्यात, वाळूत, चिखलात, दगडात, भितीवरच्या ओरखड्यात, पुरातन शिल्पातल्या चित्रविचित्र अमानुष चेहऱ्यात, उंटात आणि माकडातसुद्धा. हे सौंदर्य पाहतानाच तिच्या मनात याला एका विशिष्ट पद्धतीच्या रचनेचा किंवा पुनर्रचनेचा आकार आणि कोंदण असते. या रचनेतूनच जणू ती हे सारे पाहते; एरवी दगड, भिंती, चिखल आणि माकडे काय आपण कमी पाहतो? आपल्याला नाही ते कुठे यात सौंदर्य दिसत? स्टेलाबाईच्या मनातली रचना त्या त्या विषयाला मिळाली की मात्र तो विषय बहुश: सुंदर बोलतो.

मागे सुमारे वर्षापूर्वी या बाईने 'बीच अॅक्स्ट्रॅक्ट्स' चे एक प्रदर्शन मुंबईत भरवले होते. समुद्रकिनाऱ्याचे इतके गहिरे दर्शन विरळा. रोज समुद्रावर जाऊनही हे अशक्य.

। विजय तेंडुलकर ।

पण स्टेलाबाईने जुहूच्या किनाऱ्यावरच्या नित्याच्याच गोष्टी हेरून, विशिष्ट प्रकाश, विशिष्ट प्रमाणातली भरतीओहोटी, विशिष्ट वातावरण यासाठी तासन् तास, दिवस न् दिवस तपश्चर्या करून यातून केवढे तरी सुप्त, काव्यात्म, गूढ सौन्दर्य शोधून अनेक छायाचित्रांच्या रूपाने मांडले होते. ते पाहून डोळ्यांचे पारणे फिटले होते.

## गूढ सौंदर्य

याच बाईंचे ' फोटो कोलाजेस 'चे प्रदर्शन नुकतेच मुंबईतील केमोल्ड आर्ट गॅलरीत पाहायला मिळाले. हीही एक प्रकारे छायाचित्रेच; पण यांतले एकेक 'कोलाज' अनेक छायाचित्रांतून कापलेल्या वेगवेगळ्या आकृतींचे मिळून झालेले होते. नित्यनियमाच्याच गोष्टींच्या नैसर्गिक रचनेतले सौन्दर्याचे क्षण आधीच्या प्रदर्शनात चित्रबद्ध केले होते तर अनेक छायाचित्रांतले भिन्न भिन्न तपशील एका चौकटीत एकत्र मांडून घडणारे काही विक्षिप्त मजेदार परिणाम या नव्या प्रदर्शनात मांडले होते. यातले सौन्दर्य गूढ असले तरी काव्यात्म नव्हते; उलट एक प्रकारचा निखळ खट्याळपणा प्रत्येक चित्रातून उमटला होता.

उदाहरणार्थ, ' इन्साइड आउट ' हे चित्रच घ्या. ढोबळपणे हे चित्र एक प्राणिसंग्रहालय सुचवीत होते. यातल्या बिनगजांच्या पिंजऱ्यात माणसे आणि त्यांच्या प्राचीन संस्कृतीच्या निदर्शक अशा काही मूर्ती बसल्या होत्या आणि प्रेक्षक होता एक झेब्रा, एक म्हैस आणि एक उंट. संग्रहालयाच्या बाहेर मुक्त वातावरणात डौलाने उभा होता एक पाठमोरा झेब्रा. आता हे असे उफराटे प्राणिसंग्रहालय दाखवण्यात हेतू काय ? असे विपरित प्राणिसंग्रहालय बाईंच्या मनात का आले ? सुसंस्कृत म्हणविणाऱ्या माणसाचा जंगलीपणा बघून ? की त्यांच्या पशुत्वाने चित्रक्षोभ होऊन ? की माणसांना स्वत:चे जे प्रदर्शन अनेकदा मांडावेसे वाटते त्या प्रवृत्तीने स्फूर्ती येऊन ? कुणास ठाऊक. चित्रात क्षोभ किंवा कसलाही आवेग नव्हता. होती फक्त प्राणिसग्रहालयाची नि:स्तब्ध, उफराटी मांडणी. नाविन्याने नजर वेधून घेणारी. विक्षिप्तपणामुळे चित्रात गुंतवणारी. निष्कर्ष प्रेक्षकांवर सोपविणारी.

किंबहुना अनेक चित्रांतून असे निष्कर्ष काढणे प्रेक्षकांनाही जमण्याजोगे नव्हते. 'द जायंट्स केम' चित्रात डोंगरालगतचा विस्तीर्ण नदीकाठ दाखवला होता. डोंगराहून प्रचंड अमानुष आकृत्या डोंगरामागून डोकावत होत्या, पाण्यावरून चालत होत्या, किनाऱ्यावर पोचल्या होत्या. पाण्यात तुलनेने छोटी दोन तीन माणसे बुचकळ्या घेत होती, कपडे धूत होती. या ' राक्षसां 'च्या आगमनाची वार्ताही त्यांना दिसत नव्हती. या चित्रातून नजर खिळवून ठेवणाऱ्या एका भयापलीकडे काहीही निघत नव्हते. हे राक्षस कोठले, ते का येत होते या प्रश्नांची अपेक्षाच या विलक्षण चित्राला नव्हती. इथेही वातावरण विलक्षण नि:स्तब्ध होते. कसलाही आवाज न घडता काहीतरी भयकर आणि अनपेक्षित घडत होते.

' वे ऑफ द ऑस्ट्रिच ' चित्रात दक्षिण भारतातल्या पक्षिराज मंदिराच्या उंच निमुळत्या उंचवट्याला एका मोठ्या पानाचे निशाण आणि एका जुनाट मूर्तीची

मुद्रा लावली होती. खाली समुद्र आणि जमीन या दरम्यानचे काहीतरी पसरले होते. आणि एक शहामृग एकटेच त्या निमुळत्या टोकाकडे जाणाऱ्या पायऱ्या चढत होते. त्या शहामृगाची दया येत होती आणि चित्रातला त्याचा एकाकीपणा अस्वस्थ करीत होता. निष्कर्ष ? काही नाही. असे अस्वस्थ करणे एवढेच त्या चित्राचे उद्दिष्ट दिसत होते. एखादे भयंकर स्वप्न गाढ झोपेत पडावे तसे या प्रदर्शनातले एकेक चित्र होते. ढगातून उंट उंच मान काढून जगाकडे पाहात होता तर समुद्रातल्या बर्फाळ खडकाखालून उतारूंसकट मोटार बाहेर निघालेली होती. कुठे एका गिरगिरत्या उतारावरून मासे सुळसुळीतपणे घसरत निघाले होते आणि मांजर हसत होते, तर कुठे एखाद्या अलिशान इमल्याच्या अवाढव्य सज्जात माणसे कचरा काढीत असता फॅशनेबल चेहरे चिटोऱ्यांसारखे अधेमधे पडलेले होते. कुठे योगी हवेत तरंगत होता आणि बाई कपडे उतरवीत होती, तर कुठे खिडकीत एक मादक बाई बसून नुसत्याच कैक डोळ्यांच्या नक्षीतून पाहात असता वर 'लकी स्नफ् डेपो'ची पाटी लागलेली होती आणि वर पुन्हा एक उलटी बाई कपडे उतरवीत होती ! आकाशातून नाहीतर अवकाशातून दैवी इच्छेसारखे मध्ये घुसणारे डौलदार सुंदर हात अनेक चित्रांत प्रकर्षाने नजरेत भरत होते.

हे तर काहीच नाही. ही सर्व चित्रे सरळ मानेने समोर भिंतीवरच पाहता येत


काळ्याभोर रेशमी विपुल केसांकरिता

डोंगरे

अप्सरा

हेअर ऑईल

उत्पादक

के. टी. डोंगरे ॲण्ड कं., प्रा. लि.,

मुंबई, कानपूर, नैरोबी ( आफ्रिका )

डोंगरे बालामृताचे

होती. पण दोन चित्रे वर छताला लावलेली होती ! उंच उंच आधुनिक इमारती, उघडी अंगे दाखविणाऱ्या एकीसारख्या एक व्यक्तित्वहीन बाया, देठ खुडलेली पडती सौन्दर्यहीन फुले, असला वास्तव प्रमाणे काढून टाकलेला तपशील या टांगत्या छायाचित्रांतून जणू सर्वांच्या डोक्यात पडू बघत होता. हेही सारे गतिशील पण क्षणैक खिळलेले आणि वातावरण मुके, निःस्तब्धतेने ठास भरलेले, मारलेले !

गंमत तर खरीच; विक्षिप्तही नक्कीच; पण अस्वस्थ करण्याचे बळही तिच्यात कुठे तरी, या वैशिष्ट्यांपलीकडे होते. स्वप्ने नाहीत का जाग आली तरी आपली पाठ बराच वेळ पुरवीत ? तशी ही चित्रे प्रदर्शन पाहून झाल्यावरही मुकाट्याने पाठ पुरवणारी होती.

काही फार मौलिक पदरी पडले नाही; पण कोणाकोणाची भिकार नक्कल असलेली स्वकृत (वि)चित्रे ' कोयना आपद्ग्रस्त निधीसाठी ' अशा मानवतावादी वहाण्याने आर्ट गॅलरीत राजरोस मांडून, त्यात नट्टापट्टा करून स्वतःला मांडणाऱ्या एखाद्या केवळ उत्साही चित्रकारणीपेक्षा किंवा चितारणीपेक्षा– स्नेडबाईने केलेली छायाचित्रांची कलापूर्ण मौज किमान एल लक्ष पटींनी उजवी. ◻

## प्र द र्श ना ती ल न वे चे ह रे

अलीकडेच एक दिवशी मुंबईत क्रॉस मैदानाच्या बाजूने माझ्या मार्गाने मी जात होतो. वाटेत एक प्रदर्शन भरलेले पहिले. प्रदर्शनांचा मी तसा नादीच आहे म्हणून मी तिकीट काढून आत झुकलो.

हे असले प्रदर्शन मात्र मी प्रथमच पाहात होतो. मुंबईत प्रदर्शने वाटेल तितकी आणि वाटेल तसली होतात पण मी उत्साहाने जाऊन पाहतो कलाप्रदर्शने. मध्यंतरी एकदा एका पर्यटन–प्रदर्शनाला गेलो आणि पस्तावलो. हा अलीकडेच गुलाबांच्या एका प्रदर्शनाला गेलो आणि अक्षरशः हरखून गेलो. एका गुलाबाच्या फुलातच किती प्रकार, किती रंग, किती गहिऱ्या छटा, किती विविध प्रकारचे डौल ! वाटले की विधात्याने केलेल्या उःत्स्फूर्त कवितेतल्या रसरशीत आणि स्वर्गीय सौंदर्यस्थळांचाच गुलाबी सडा जणू समोवार पसरला आहे !

पण मी लिहिणार आहे ते प्रदर्शन आणखीच वेगळे.

बाहेरच फिल्मी संगीताबरोबर एक पार्श्वसंगीत ऐकू येत होते. याला एकच स्वर नव्हता की लय नव्हती. साधारण बालवर्गात ज्या प्रकारचा गोंधळ ऐकू येतो तसा काहीसा हा गोंधळ होता. एक स्वर. तर तर दुसरा खाली. एक दीर्घ तर दुसरा ऱ्हस्व. असे शेकडो मुक्त स्वर एखाद्या वाद्यमेळातले वादक, एखादे मादक पेय घेऊन मनमानी आपापली वाद्ये समजा वाजवू लागले, तर जी धमाल येईल ती चालू होती. इथला एक 'गायक' उंच तारसप्तकात 'कोकोक्‍को' करून पाहटेची पेटंट रागदारी आळवीत होता तर दुसरी 'गायिका' सुस्त माध्यान्हीचा 'क्लक् क्लक् क्लक्, एवढा, एकच धीमा आणि तुटक 'रियाझ' करीत होती. तिसरा 'क क क क क क क' अशी एकाक्षरी बाराखडी उघड्या चोचीने एकसारखा न कंटाळता गिरवीत होता; तर चौथा ठरीव अंतराने 'कोक्' एवढेच न विसरता करीत होता. बेहतरीन खटके आणि मींडा घ्याव्यात तसे एकेकाचे गळे फिरत होते, माना उंचावत आणि वक्र होत होत्या, तुरे झुलत होते. डोळ्यात खांसाहेबी उग्र आणि धुंद रुबाब भरला होता.

## निरनिराळ्या आसामींची उपस्थिती

पण ही सर्व मंडळी होती बंदिवान. यांचा तोरा संगीतातल्या बुजुर्गांचा, पण अवस्था लॉकपमधल्या भुरट्या आणि भामट्या रहिवाशांसारखी होती. कुलूपबंद पिंजऱ्यात एकेक आसामी बंद होती.

अशा कलाकृती कुठे मांडलेल्या पाहायला मिळणे दुर्लभच.

मी पाहात सुटलो.

प्रत्येक पिंजऱ्यावर पाटी होती. तिच्यावर आतल्या रहिवाशाची जात नमूद होती. एकेक लेबल लटकत होते; त्यावर त्याचा भाव लिहिलेला होता.

कोणी विलायती तर कोणी गावठी. कोणी लढाऊ तर कोणी नागरी. कोणाची चित्पावन ब्राह्मणाची तेजःपुंज गौर कांती तर कोणी डोंबाऱ्यासारखा तुकतुकीत काळा. कुणाच्या चेहऱ्याच्या दोन्ही बाजूंनी लोंबत्या लालस मांसाच्या मुंडावळ्या झुलत आहेत तर कुणाचा तुरा 'हायलँडर' पलटणवाल्याच्या शिरोभूषणासारखा मध्ये किंचित मोडून कानापर्यंत ओघळला आहे. कुणी हळदीकुंकवाच्या सवाष्णी-सारखी आपला अधळपधळ बांधा शालूच्या दुलदुलीत रंगाच्या कांतीत लपेटून तयार आहे, तर कुणी घरकामातल्या लेकुरवाळ्या सुगरिणीसारखी आपादमस्तक मळलेली आणि विस्कटलेली आहे. आणि स्वतंत्रपणे यापलीकडेच एकेका जाळीच्या घरात पिवळी धम्मक टिल्ली टिल्ली, टिवटिवती, पन्नास पन्नास पोरे. चोची वर करून नुसतीच टिवटिवत राहणारी. ना तुरा, ना पंख, ना पिसे की ना धड शेपूट. केवळ तलम लोकरीचे तुरतुरते नाजूक हलके गुंडगोळे. इवलाले कंठ ताणून एका सुरात काहीतरी मागणारे.

आपण पाहिले आणि बेभान झालो. हाताच्या अंगठ्याचे ठसे शाईने भराभरा

कागदाऐवजी प्रत्यक्षातच उठवून त्यांना चोचींचे चिमणे त्रिकोण पटापटा काढावेत ना, तशा वाटणाऱ्या या गडबडगुंड्यापासून पुढे तो महान चित्रकार आणि मूर्तिकार किती आकार, प्रकार घडवीत होता ! केवढा डौल, केवढा विस्तार निर्माण करीत होता. त्याही अघल्या मघल्या अवस्था प्रदर्शनात दिसत होत्या. बाळपणचा गोंडसपणा गेलेला आणि पूर्ण वाढीचा भरदारपणा अजून उणा अशा या बेडौल, कुरूप, केविलवाण्या अवस्था. मान नुसतीच उंच, तुऱ्याचे नुसतेच थोटुक, पिसांचे तुटपुंजे फराटे नको तिथे ओढलेले, आणि जोडीला आपण जणू मदनाचे पुतळे आहोत असे एकेक कुर्रेबाज आविर्भाव, अशी ही शैशव टाकून कुमारावस्थेत आलेली कोंबडे मंडळी म्हणजे जणू पूर्ण कोंबड्यांची कच्ची रेखाटनेच वाटत होती. यात मग अघल्या मघल्या जागा आपल्या जादूच्या कुंचल्याने भरीत तो कुशल चित्रकार पाहता पाहता त्यातून नवी डौलदार चित्रे निर्माण करींत असावा.

या 'चित्रां'चे पुढे काय तेही या प्रदर्शनात होतेच. शांति-सेनेच्या अमेरिकन सैनिकांनी आणि मुंबईतल्या उत्साही मंडळींनी उघडलेली दोन आहार-गृहे अंडी आणि कोंबड्या यांपासून तयार केलेले चमचमीत पदार्थ विकीत होती. किंबहुना प्रदर्शनाचे तमाम प्रेक्षक अर्ध्या प्रदर्शनानंतर एकेक कोंबडी पोटात ठेवूनच उरलेल्या प्रदर्शनाचा आस्वाद घेताना दिसत होते.

कोंबडे हे काही मोराप्रमाणे रूढार्थाने सुंदरात जमा नव्हे. पण त्याला त्याचे असे एक 'व्यक्तिमत्त्व' असते, किंबहुना प्रत्येक कोंबड्याला त्याची वेगळी व्यक्तिवैशिष्ट्येसुद्धा असतात हे या प्रदर्शनामुळेच मला कळले.

तरीही कावळेमहाशयांची सर या मंडळीला नाहीच. ○


# पुरंदऱ्यांची नौबत

ब. मो. पुरंदरे

मूल्य साडेतीन रुपये

राजहंस प्रकाशन

४१९ नारायण, पुणे २

Statement about ownership and other particulars

('MANOOS' Weekly)

FORM IV

( See Rule 8 )

| | |
|---|---|
| 1. Place of Publication | POONA |
| 2. Periodicity of its publication | Weekly |
| 3. Printer's Name<br>Nationality<br>Address | S. G. Mazgaokar<br>INDIAN<br>419 Narayan Peth,<br>Poona 2 |
| 4. Publisher's Name<br>Nationality<br>Address | As above |
| 5. Editor's Name<br>Nationality<br>Address | As above |
| 6. Name and addresses of individuals who own the newspaper and partners or shareholders holding more than one per-cent of the total capital. | Rajhansa Prakashan<br>419 Narayan Peth,<br>Poona 2.<br>(1) S. G. Mazgaokar<br>(2) B. M. Purandare |

I, S. G. Mazgaokar, hereby declare that the particulars given above are true to the best of my knowledge and belief.

Date 31-3-1968

Signature of Publisher
S. G. Mazgaokar

# अभय

**। सौ. मंदाकिनी चिपळूणकर ।**

अभयला आज स्पेशल खोलीत हलवलं होतं. फिकट निळ्या रंगाची, अगदी कमी प्रकाशाची ती खोली आज अगदी शांत, गंभीर वाटत होती. अभय अतिशय आजारी होता, त्याचा चेहरा सुजलेला, फिकट दिसत होता तरी चेहऱ्यावरचे भाव मात्र अगदी सौम्य होते. त्याच्यावर मृत्यूची काळी भीषण छाया पडली होती, तरीही डोळे हसत होते. एवढासा ६।७ वर्षांचा कोवळा अशक्त जीव. त्याचे सोनेरी केस त्याच्या गोल चेहऱ्याला फार शोभा देत असत. तो इतका आनंदी असे की सगळ्या नर्सेस, डॉक्टर्स लोक त्याच्या सहवासात दवाखान्यातले सारे कष्ट विसरून जात. कॅन्सर हॉस्पिटलमधील थोडेच पेशंट परत घरी जातात याचंही विस्मरण हॉस्पिटलमधल्या लोकांना पडे, त्यांतलीच मी पण एक नर्स होते.

अभयला भयानक कॅन्सरनं गांठलं होतं. त्याला आज परत रक्त द्यायचं होतं, कारण त्या रक्तावरच, त्या उसन्या रक्तावरच तो जिवंत राहात होता. हाडांचा भयंकर कॅन्सर–पांढऱ्या पेशी त्याच्या हाडात अतिशय भयंकर प्रमाणात वाढत होत्या. त्यामुळे त्याचं सारं शरीर सुकत चाललं होतं.

मी नर्सेसच्या नेहमीच्या प्रसन्नतेनं आणि चपलतेनं अभयच्या खोलीत पाऊल टाकलं. मी स्टॅंडवर बाटली लावीत असता अभयनं मला विचारलं, "सिस्टर, ह्या रक्तानं मला आता बरं वाटेल नाही? लोकं किती चांगले आहेत. मी बरा झालो ना की, मी पण आजारी माणसांना माझं रक्त द्यायला इथे येऊ का?" त्याचा आवाज इतका खोल गेला होता की मला खाली वाकून कान जवळ नेऊन त्याचं बोलणं ऐकावं लागे. त्याला श्वास घ्यायलासुद्धा फार अडचण पडत असे, म्हणून तो थांबत थांबत बोलत असे. एवढं बोलण्यानं सुद्धा त्याला अत्यंत थकवा आला. किती गंभीर पण शांत दिसत होता त्याचा चेहरा! एवढ्या छोट्या वयात केवढा समजूतदारपणा आला होता या मुलाला. मी त्याची नाडी पाहिली. एखाद्या छोट्या पक्षासारखी ती जलद पण संथ लागत होती!

हॉस्पिटलमधे इतके पेशंट होते की, अभयकडे परत जायला मला खूपच वेळ झाला. मी गेले तेव्हा त्याची आई त्याचा शोध घेत होती. कारण आज त्याला

स्पेशल खोलीत ठेवलं होतं ते तिला माहीत नव्हतं. त्याची आई अगदी त्याच्याच-सारखी – तसेच सोनेरी केस व तोच मोहक गोड चेहरा, तोच चेहऱ्यावरचा हसरा भाव तिच्याही चेहऱ्यावर होता.

"आपण अभयच्या आई का ?" मी विचारलं.

"हो हो, तुम्ही कसं ओळखलं ?" काळजीनं व्याप्त झालेल्या चेहऱ्यावर करुण स्मित उमटलं आणि मिटलंही...पण अभय कसा आहे आता ?"

नकोसा वाटणारा तो भयानक प्रश्न !

"अभय ना ? छान आहे की. इतरांच्या गडबडीचा त्रास होऊ नये ना, म्हणून त्याला आज स्पेशल खोली दिली आहे. स्वारी भलतीच खुषीत आली आहे. इतका गोड लाघवी आहे तुमचा अभय. आम्हा सर्वांना अगदी वेड लावलं आहे त्यानं." मी खोटया उत्साहाने बोलत आहे हे तिनं ओळखलं. ती माझ्याकडे पाहात कृतज्ञतेनं हसली. स्पेशल खोलीच्या उल्लेखानं तिचे मूळचे काळे डोळे आणखीनच गर्दभोर झाले. काजळकडा आता झिरपू लागणार असं वाटू लागलं – म्हणजे तो जास्त आजारी झाला हे तिनं लगेच ओळखलं.

त्या मंद उजेडाच्या निळया खोलीत अभय झोपला होता. ती आत गेली तशी मी उंबऱ्यावरच थबकले. दोघांच्या श्वासोच्छ्वासाचे आवाजच काय ते फक्त ऐकू येत होते. तिचा घाबरा पण संथ श्वास, त्याचा जलद फडफडणारा श्वास – त्याच्या शरीराला होत असलेल्या वेदना पांघरुणातूनसुद्धा दिसत होत्या.

"अभय" तिनं हलकेच हाक मारली. तो झटक्याने कुशीवर वळला. तिच्याकडे टक लावून बघू लागला. मला तर वाटलं की त्यानं तिला ओळखलंच नाही; पण मग तो इतक्या वेगानं उठून बसला की त्याची आई चमकलीच. 'आई' करून



त्यानं बाहू पसरले. तिनं त्याला न बोलता जवळ घतलं, थोपटलं, कुरवाळलं, आणि मग हलकेच उशीवर झोपवलं. त्याचं आवडतं खेळणं – मला मोठा रबरी कुत्रा त्याच्या जवळच होता. अगदी हळू आवाजात तो तिला सांगत होता, " आई, माझे बूट मला हवेत, देशील आणून उद्या ?"

" अभय, राजा, असं काय बरं ? बूट कशाला आत्ता ?" तिनं विरोध केला. अभयनं सत्याग्रह पुकारला, " असं काय आई ? आम्हाला बूट पाहिजेत, बूट !" त्याला थोपटत तिनं त्याचा पापा घेतला. ती हलकेच पावलं टाकीत माझ्याजवळ येऊन मला थोडं बाजूला घेऊन गेली. अभयचे व्याकुळ डोळे आमचा पाठलाग करीत होते.

" त्याला बूट द्यावेत काहो ? तुम्हांला काय वाटतं ? त्याला ते कशाला पाहिजे आहेत ते मला माहीत आहे. फार दिवस काही उरले नाहीत त्याचे !" बोलता बोलता तिला आलेला हुंदका तिनं कष्टानं मागे परतला. माझंही हृदय भरून आलं. मी जरा विचारात पडले. कारण पेशंटच्या – छोटया मुलांच्या – अंगावर काही वस्तू असता कामा नयेत, असा नियम होता. त्यातून अभयइतक्या आजारी मुलांच्या तर नाहीच नाही – मी ही परवानगी दिली असती तर त्याबद्दल मला मोठ्या डॉक्टरांकडून रागावून घ्यावं लागलं असतं....पण पण – माझं मन इतकं कठोर करताच येईना. " नियमाविरुद्ध आहे हे, पण मला वाटतं काही हरकत नाही त्याला बूट द्यायला " मी गेले व त्याचे बूट घेऊन आले. ते बूट उचलताना माझा गळा दाटून आला. अभयला ते बूट का हवेसे वाटतात ते माझ्या ध्यानी येऊन जास्तच मन द्रवलं. दणकट पळणाऱ्या पावलांकरता ते बूट बनवले होते – आणि अभयचं तर ते ध्येय होतं. लवकरच बूट घालून धावायचं, पूर्ण बरं व्हायचं !

" हे, घे तुझे बूट " त्याच्या आईनं ते त्याच्या पुढे केले.

" आं, इथंच होते माझे बूट ?" असं म्हणत अभयनं आपले हात पुढे केले तशी त्या त्याच्या शिरेत घातलेल्या रबरी नळ्यापण पुढे आल्या, हालल्या. त्यानं ते बूट घट्ट धरले. वेदना सोशीत तो एकदम उशीवर लवंडला– हसत हसत– " हं आता मी लवकरच घरी जाणार हं सिस्टर, बूट घालून ! येऊ ना आई ?" आईकडे पाहात त्यानं विचारलं.

" इतक्यात नाही अरे– ह्या जा म्हणतील ना तेव्हा घरी जायचं आपण !"

" मग मी हे बूट इथंच ठेवतो– म्हणजे घरी जायच्या वेळी लगेच बूट घालीन." मला अगदी अश्रू आवरेनात म्हणून मग मी तिथून निघूनच गेले.

मला किती वेळा वाटायचं ह्या कॅन्सर हॉस्पिटलची नोकरी सोडून दुसरीकडे जावं. ह्या ठिकाणी आम्ही आशा नसलेल्या पेशंटची काळजी घेत होतो. बहुतेक रोगी जगत नसत. काही जे बरे होत तेदेखील मृत्यूची टांगती तलवार कधी ना कधी पडणार अशी कल्पना गृहीत धरूनच घरी जात– हॉस्पिटलच्या आजूबाजूस

धावतं, हसरं, आनंदी जीवन वावरत असे पण आत–आत मात्र– माणसाचं मरण सुखकर कसं करावं, त्याच्या आयुष्याची दोरी कितपत लांबवावी याच अखंड प्रयत्नात आम्ही असू– मुलांच्या वॉर्डमध्ये जायचा तर मला भयंकर तिरस्कार वाटायचा– रोज मला त्या माझ्या लाडक्या पेशंटचा तक्ता भरावा लागे– त्याचे किती राहिले असतील असा मनात दुष्ट विचार येई... पण अशा दु:खी परिस्थितीतही आम्ही त्या छोटया जीवांना आनंदित ठेवण्याचा प्रयत्न करीत असू– माझं सारं लक्ष अलीकडे अभयवर केंद्रित झालं होतं. अभय ते बूट छातीशी धरून स्वस्थ पडत असे– दु:ख सोशीत. त्याच्या या कृतीमुळे डॉक्टर आणि नर्सेस यांच्यामध्ये तो अगदी 'स्पेशल पेशंट' झाला होता. डॉक्टर तर म्हणाले सुद्धा "मला तर कधी कधी असं वाटतं की आमचा हा शूर वीर खरंच इथून चालायला लागणार बूट अडकवून ! पण त्याच्या चार्टकडे बघितलं की..."

एके दिवशी त्याची आई अगदी उत्साहित होऊन आली. तिला कशाचा तरी भलता आनंद झाला होता. अभयलाही आश्चर्य न् आनंद वाटेल अशी तिची खात्री होती– आली तीच मुळी हाका मारीत... "अभय, आज एक गंमत सांगणार आहे तुला मी– अरे किनई ह्या लोकांनी अगदी खरेखुरे जिवंत प्राणी आणले आहेत– ससा, पांढरे उंदीर" "ससा आई ? ब्राऊन शशा की पांढरा शशा ? जिवंत आई ? पळणारा अं, खरं ?" अभयच्या चेहऱ्यावर आनंद, हर्ष, आश्चर्य यांचं इतकं मनोहर मिश्रण झालं होतं– त्याचे निळे डोळे आश्चर्यानं मोठमोठे झाले होते. माझ्या व त्याच्या आईच्या चेहऱ्यावर त्याची नजर सारखी भिरभिरत होती. त्याच्या जगण्याच्या दुर्दम्य आशेत त्यानं आम्हाला आपल्या डोळयानं पकडून ठेवलं होतं– बाहेरच्या व्हरांडयातून गाडी आत आणली जात होती– त्याच्यावर कुणी पेशंट नव्हता तर पिंजरे होते. छोटेछोटे पांढरे उंदीर, ससे, रंगीबेरंगी चिमण्या यांनी भरलेले पिंजरे. ते प्राणी, पक्षी गमतीदार आवाज करून हॉस्पिटलात चैतन्य भरीत होते– एका सावळया दाईनं एक पिंजरा अभयच्या खोलीत आणला. तोंड भरून हसत तिनं त्याला म्हटलं "हा घे तुला एक मित्र आणला आहे." तिनं तो पिंजरा त्याच्या बिछान्याशेजारच्या टेबलावर ठेवला आणि झाकण उघडलं– अभय चकित नजरेनं बघत होता. पिंजऱ्यात काही तरी हाललं नी लोकरीसारख्या मऊमऊ, गुबगुबीत, लाललाल डोळयांचा ससा बाहेर काढून अभयच्या मांडीवर ठेवला, 'मी याला हात लावू का ?' अभयचे हात सशाच्या अंगावर फिरावणार होते– त्याच्या आईनं त्याचे ते कृश हात धरून हलकेच सशाच्या पाठीवर टेकवले. ससा प्रथम ते पांढरे, कृश, फिक्कट हात पाहून घाबरला पण मग त्याने कान हालवले, गुबगुबीत अंग हिसकलं आणि नाक हळूच अभयच्या हातावर टेकवलं– अभय शांत, एकटक नजरेनं सशाकडे पाहात राहिला. अभयच्या आईचे डोळे भरून आले–

○



# एक आठवण

**सौ. प्रभात चिपळूणकर**

“बघ माई, तुला कल्पनासुद्धा नव्हती ना की, आपल्याला मुलगी होईल. तिची मंगळागौर आपल्या स्वतःच्याच घरी, आपल्या डोळ्यांदेखत नि एवढ्या थाटामाटात होईल म्हणून ? पण तुझा परमेश्वर तुझ्या पाठीशी आहे ! त्यानं आज तुझी ती इच्छा पूर्ण केली ! ”

१९४५ ची गोष्ट आहे ही. माझ्या पहिल्या मंगळागौरीच्या दिवशी पूजेला आरंभ करण्यापूर्वी तात्यांना नमस्कार करायला मी गेले तर त्यांचे नेत्र आनंदाश्रूंनी डबडबलेले मला दिसले. ती. सौ. माईचा आनंद तर काय वर्णावा ? आता काय करू नि काय नको असं तिला होऊन गेलं होतं. आपल्या मंगळागौरीची पूजा तात्यांनी पाहावी नि आपणा सर्वांना त्यांनी आशीर्वाद द्यावा अशी, मंगळागौरीसाठी जमलेल्या साऱ्याच मुलींची इच्छा होती. सारी मंगळागौर घरच्या तात्यांच्या हातांनीच लावलेल्या बागेतील फुला–पत्रींनीच सजवलेली होती. पारिजातक, सोनचाफा, गुलाब इत्यादी तऱ्हेतऱ्हेच्या रंगीबेरंगी नि सुगंधित फुलांनी मंगळागौर जणू काही विविधरंगी नि सुगंधित अशा इंद्रधनुष्यातच गुंफल्यासारखी वाटत होती. पूजेतील फुलांची आकर्षक सजावट नि मनाला प्रसन्न करणारा तो मधुर सुगंध सर्वत्र दरवळलेला. तात्यांच्या चित्तवृत्ती या वातावरणात बऱ्याच प्रसन्न झालेल्या दिसल्या. पण ती पूजा पाहता पाहता त्यांची एकदम गानसमाधी केव्हा लागली कोण जाणे ! भराभर त्यांच्या तोंडून त्यांच्याच ‘कमला’ काव्यातील ओळीच्या ओळी त्यांच्या तोंडून बाहेर पडू लागल्या. ती काव्यसमाधी उतरताच आपल्याला वाटलेलं समाधान माईला बोलावून त्यांनी जे व्यक्त केलं तेच त्यांचे उद्गार मी सुरुवातीला दिलेले आहेत.

## दिनांक २६ फेब्रु. १९६८
## स्वा. सावरकरांची
## दुसरी पुण्यतिथी.

राष्ट्रस्वातंत्र्यासाठी बालवयातच सशस्त्र क्रांतीची उग्र शपथ घेऊन कर्तव्याच्या धारेवरून बेहोषपणे धावत असताना, भर तारुण्याच्या उंबरठ्यावर असतानाच दोन जन्मठेपींची पन्नास वर्षे काळ्या पाण्याची शिक्षा पाठीवर घेऊन अंदमानी नरकासुराच्या जबड्यात निर्भयपणे प्रवेश करणारे माझे तात्या – नुसते त्या प्रसंगाचे वर्णन करतानाही आज माझ्या अंगावर शहारे येतात – संसारी जीवनात अत्यंत हळुवार भावनांचे नि सुकुमार अंतःकरणाचे होते, असं सांगितलं तर कुणाला खरंही वाटायचं नाही, पण ही वस्तुस्थिती आहे. अंदमानात खडतर कारावास भोगत असतानाही भावनेची हळूवार भावफुले ज्यांनी अणकुचीदार दगडाच्या साहाय्याने कारागृहाच्या भिंतींवर मोठ्या कौशल्याने फुलविली नि ' कमले ' चे उद्यान बहरविले तेच महाकवी सावरकर, हिंदुस्थानातील ब्रिटिश राजवट सशस्त्र क्रांतीच्या साहाय्याने उलथून पाडण्याच्या आरोपावरून पंचवीस वर्षांपूर्वी अंदमानच्या अंधेरीत कारावास भोगणारे तेच क्रांतिकारक सावरकर आज आपल्या कन्येची, आपल्या स्वतःच्याच बंगल्यात, आणि आपल्या डोळ्यांदेखत नि थाटात साजरी झालेली मंगळागौर पाहून समाधान व्यक्त करीत होते. जणू काही कमलाकाव्यच मूर्तस्वरूप घेऊन आपल्यासमोर आवतरल्याचा त्यांना भास होत होता.

दोन जन्मठेपींची शिक्षा नि तीही अंदमानात भोगावयाची म्हणजे या जन्मी उरलीसुरलेली शिक्षा भोगण्यासाठी पुढच्या जन्मी सिद्धता ठेवायची ! अशा परिस्थितीत त्या शिक्षेतून सुटून आपण परत येऊ नि संसार करू अशी कल्पना करणेही धाडसाचेच ! पण तात्यांनी आपल्या मनाची तशी समजूत घातली होती आणि आश्चर्याची गोष्ट अशी की ही त्यांची

आशा, ते त्यांचे भाकीत अक्षरश: खरे ठरले ! त्यांची, शिक्षेची कालमर्यादा संपण्यापूर्वीच मुक्तता झाली. स्वत:चा बंगला झाला. बंगल्याभोवती लहानशी बाग झाली. आणि त्या बागेतील सुंदर सुंदर नि सुवासिक फुलांनी त्यांच्या कन्येची पहिली मंगळागौर सजली.

अंदमानात शिक्षा भोगीत असताना तेथील राजबंद्यांव्यतिरिक्त इतर बंद्यांना मिळणाऱ्या सवलती पाहता, कदाचित आपल्यालाही कधी काळी अशी सूट मिळाली तर मी येथे छोटेसे घर बांधून त्याच्या भोवती लहानशी बाग करीन आणि सौ. माईला आणून येथे संसार सुरू करीन, असे विचार मनाला विरंगुळा देण्यासाठी, कधी कधी ते आपल्या मनाशी करीत असत. पण तेच विचार निरनिराळ्या प्रकारे कधी काळी प्रत्यक्षात उतरल्याचे पाहावयाला मिळतीलच अशी मात्र त्यांची शाश्वती नव्हती.

मंगळागौरीच्या आदल्या रात्री फुले नि पत्री काढण्यासाठी मी आपल्या बंगल्याच्या बागेत गेले असता तात्यांनी काढलेले उद्गार अद्यापही मला स्मरतात. तात्या म्हणाले होते, ' किती आश्चर्यकारक हे जीवन ! स्वप्न नव्हे, सत्य ! प्रत्यक्ष माझी मुलगी आज मी बांधलेल्या घरात नि मीच लावलेल्या बागेत आपल्या पहिल्या मंगळागौरीसाठी फुले नि पत्री तोडीत आहे ! '

आशा आणि तृप्ती, सत्य आणि स्वप्न, भविष्य आणि प्रचीती यांचा जणू काही विलक्षण असा त्रिवेणी संगमच तात्यांच्या मुद्रेवर मिसळणाऱ्या आत्मिक समाधानाच्या तेजात तळपताना आढळत होता. राष्ट्रस्वातंत्र्यासाठी तारुण्याच्या उंबरठ्यावर सशस्त्र क्रांतीचे सतीचे वाण करी धारण करणारे तात्या ! त्या वेळचे त्यांच्या मुद्रेवरील हुतात्मतेचे मोहक तेज नि जीवनाचा माध्यान्ह काल लोटल्यानंतर एके काळी अशक्य वाटलेल्या संसारी जीवनातील साफल्याचं त्यांच्या मुद्रेवर विलसणारं अपूर्व समाधान ! कोणी प्रतिभावान चित्रकार ही दोन चित्रे रंगवील काय ? ही दोन चित्रे आपल्या कल्पनेनंच मन:श्चक्षूं समोर उभी केली की तात्याचं दर्शन मला आजही घडतं ते—

**वज्रादपि कठोराणी । मृदूनि कुसुमादपि !**



# दि भोगावती सहकारी साखर कारखाना लि.,

शाहूनगर, परिते, जिल्हा कोल्हापूर

टेलिग्रॅम – भोगावती | दूरध्वनी क्रमांक – १७१

**महाराष्ट्र राज्याच्या सहकारी साखर कारखानदारीच्या क्षेत्रांत भोगावती सहकारी साखर कारखाना यशस्वीपणे वाटचाल करीत आहे.**

## ठळक वैशिष्ट्ये

★ भोगावती खोऱ्यांतील कृषि–औद्योगिक विकासाचा केंद्रबिंदू व सहकारी चळवळीचे स्फूर्तीस्थान.

★ कर्तव्यदक्ष संचालक मंडळ, कार्यकुशल कामगार वर्ग व उत्साही सभासद याचा त्रिवेणी संगम.

★ कारखान्याच्या गाळप शक्तींत २००० मे. टन पर्यन्त वाढ करण्याबाबत महाराष्ट्र सरकारची भारत सरकारकडे शिफारस.

★ शेती धंद्यामध्ये शेतकऱ्यांचे उज्वल भवितव्य निर्माण करण्यासाठी कार्यान्वीत केलेल्या १३ लाख रु.च्या ११ जलसिंचन योजना.


★ तीन सहकारी साखर कारखान्याच्या नियोजित डिस्टिलरींत प्रमुख भागीदारी.

★ सन १९६७–६८ चा गळीत हंगाम दि. २६–१०–१९६७ पासून सूरू होऊन दिनांक ३१–१–१९६८ अखेर १, २४, ६२५ पोत्यांचे उत्पादन.

आर. एच्. देशपांडे
जी. डी. सी. ए., ए. सी. ए.
मॅनेजिंग डायरेक्टर.

ना. रा. पाटील
व्हा. चेअरमन्

दा. कृ. पाटील
कौलवकर
चेअरमन्




लेनिनचा खून करण्याचा प्रयत्न झाल्यानंतर बोल्शेव्हिकांचा राजकीय दहशतवाद अधिक जोराने उफाळून आला.

झिनोव्हेव्हने पेट्रोग्राडमध्ये धरपकडीचे सत्र सुरू केले. एका आठवड्याच्या आत आठशेहून अधिक लोकांना तुरुंगाच्या गजाआड बंद करण्यात आले. ज्यांचा राजकीय घडामोडींशी यत्किंचितही संबंध नव्हता अशा अधिकाऱ्यांनाही तुरुंगाची हवा खावी लागली. जे अधिकारी बोल्शेव्हिक विचारसरणीचे नव्हते त्यांना अद्दल घडविण्यासाठी झिनोव्हेव्हने या खुनाच्या प्रयत्नाचा पुरेपूर वापर केला. कोणाकोणास अटक करण्यात येत आहे याची 'इझवेस्तिया'मध्ये दररोज नावे प्रसिद्ध होत होती त्यावरून या धरपकडीचा उद्देश सहज स्पष्ट होत होता.

विरोधकांची पाळे-मुळे खणून काढण्याचा बोल्शेव्हिक राजवटीने चंग बांधला होता. त्यात अनेक निरपराध नागरिकांचीही आहुती पडत होती आणि त्याबद्दल राज्यकर्त्यांना मुळीच भीती वाटत नव्हती. क्राकोवस्की या कामगाराला फाशी देण्यात आले याचे साधे कारण असे होते की,तो मेन्शेव्हिक पक्षाचे कार्य करीत होता. क्राकोवस्कीप्रमाणे किती कामगार या हत्याकांडात बळी पडले याची मोजदाद करणेही अशक्य होते. हा दहशतवाद केवळ मॉस्को आणि पेट्रोग्राड या दोन प्रमुख शहरांपुरताच मर्यादित होता असेही नव्हे. रशियातील प्रत्येक शहरात धरपकड आणि फाशी हे नित्याचे प्रकार झाले होते. हे सारे सरकारी आदेशानुसार होत होते. बोल्शेव्हिक सरकारचा गृहमंत्री पेट्रोव्हस्की याने ठिकठिकाणच्या सोव्हिएटना हुकूम दिला होता— 'आपल्या विरोधकांची गय करण्याची चूक कोणाच्याही हातून घडता कामा नये.'

# विरोधकांचे आवाज बंद करूनच लेनिनची एकतंत्री राजवट प्रस्थापित झाली, या राजवटीला लोकशाही कधीच मंजूर नव्हती.

हा दहशतवाद केवळ राजकीय विरोधकांपुरता मर्यादित होता असेही नव्हे. या राजकीय कार्यकर्त्यांच्या बायका–मुलांनाही त्याची धग सहन करावी लागे. विरोधी पक्षांचे ते कार्यकर्ते 'चेका'च्या हाती लागत नव्हते त्यांच्या निरपराध बायका-मुलांना ओलीस ठेवले जाई आणि जर का भूमिगत कार्यकर्त्यांचा तपास लागत नाही असे आढळून आले तर या बायका–मुलांना गोळ्या घालून ठार केले जाई. विरोधकांचे सारे नैतिक धैर्य खच्ची करणे या एकाच ध्यासाने लेनिनच्या आशीर्वादाने चेका ही गुप्त पोलिस संघटना धुमाकूळ घालत होती.

आपल्या राजकीय दहशतवादाला तत्त्वज्ञानाचे गोंडस स्वरूप देण्यासाठी बोल्शेव्हिक पत्रांमध्ये चढाओढ सुरू होती. १८ ऑगस्ट १९१९ च्या आपल्या अंकामध्ये 'रेड स्वोर्ड' हे पत्र लिहिते– 'आम्ही नवी नीती अंगीकारलेली आहे. कोठेही जुलूमजबरदस्तीचे नाव शिल्लक उरता कामा नये याच एका हेतूने प्रेरित होऊन आम्ही आमचे धोरण आखलेले आहे. आम्हाला कोणतीही गोष्ट करण्याची परवानगी आहे. कारण मानवजातीची गुलामगिरीतून सुटका करण्यासाठी आम्ही हातात शस्त्र धरले आहे. कोणत्याही एका व्यक्तीशी आमचे भांडण नाही, सर्व 'बुझ्वा' समाज नष्ट करणे हेच आमचे एकमेव उद्दिष्ट आहे.'

६

बोल्शेव्हिक राज्यकर्ते दहशतवादाने बेभान झालेले आहेत अशी जेव्हा सार्वत्रिक ओरड होऊ लागली तेव्हा देशात मोकाट सुटलेल्या हिंसाचाराला आपण जबाबदार नाही असा खुलासा करणे लेनिनला

आवश्यक वाटले. तो म्हणाला, 'आमचे हितशत्रू आमच्यावर अकारण दहशतवादाचा आरोप करीत आहेत. उलट आम्हालाच दहशतवादाला तोंड द्यावं लागत आहे. इंग्लंड, फ्रान्स, प्रभृती राष्ट्रांच्या आक्रमणामुळे दहशतवादाचा जन्म झाला असून त्याचा प्रतिकार करणे आम्हाला अपरिहार्य ठरलं आहे.'

लेनिनच्या या खुलाशात काहीच अर्थ नाही अशी वस्तुस्थिती साक्ष देत होती.

बोल्शेव्हिकांनी अनावर हिंसाचार करूनही रशियातील बोल्शेव्हिकविरोधी गट अद्याप निष्प्रभ झाले नव्हते. शेतकरीवर्गाला हाताशी धरून ते ठिकठिकाणी बंडाचा झेंडा उभारत होते. राज्यकर्त्यांचा बेसुमार दहशतवाद आणि अन्य राजकीय पक्षांच्या उठावाचा प्रयत्न यांमुळे रशियाची अर्थव्यवस्था खिळखिळी होत चालली होती. १९१८ मध्ये अन्नधान्याचे उत्पादन दहा टक्क्यांवर आलेले होते. शेतकरी आणि व्यापारी आपल्याशी सहकार्य करीत नाहीत असे आढळून आल्यानंतर बोल्शेव्हिक राजवटीने ८ ऑक्टोबर १९१९ रोजी एक हुकूम काढून सर्व अंतर्गत व्यापार आपल्या ताब्यात घेतला. सर्व लहान-मोठी दुकाने बंद करण्यात आली. त्यामुळे आपल्या जवळचे अन्नधान्य सरकारी कोठारांत घालून दिल्याशिवाय शेतकऱ्यांना गत्यंतर उरले नाही. सर्व नागरिक सरकारचे सेवक असून त्यांनी सरकारी चाकरी इमानेइतबारे केली पाहिजे असाही लेनिनचा आग्रह होता. त्यानुसार त्याने एक मसुदाही तयार केला. मात्र हा हुकूम आताच जाहीर करणे इष्ट नव्हे असे त्याला वाटले. त्यामुळे तो तेव्हा प्रसिद्ध करण्यात आला नाही. लेनिनच्या मृत्यूनंतर १९२७ मध्ये हा मसुदा प्रसिद्ध करण्यात आला.

लेनिनने या मसुद्यात म्हटले होते—' प्रत्येकाने दररोज आठ तास काम केल्यानंतर तीन तास सरकारी काम केले पाहिजे. ज्यांचे मासिक उत्पन्न पाचशे रुबलसपेक्षा जास्त आहे त्यांनी हे जादा काम केले आहे किंवा नाही याची नोंद ठेवण्यात येईल. हे नोंद ठेवण्याचे काम स्थानिक सोव्हिएट, कामगार संघटना किंवा लाल रक्षक यांच्याकडे सोपविण्यात यावे. या नोंदवहीत खोटी माहिती लिहिण्यात आली तर तसे करणाऱ्याला लष्करी कायद्यानुसार शिक्षा ठोठवण्यात येईल. ज्या कोणाला शस्त्रे जवळ बाळगायची असतील त्यांनी त्याबद्दल सरकारकडून परवाना घेतला पाहिजे. परवान्याशिवाय शस्त्रे बाळगणे हा गुन्हा आहे. हा गुन्हा करणाऱ्याला गोळी घालून ठार करण्यात येईल. धान्यसाठे दडवून ठेवणाऱ्यांनाही हीच शिक्षा दिली जाईल.'

देशातील सर्व व्यापारी आणि औद्योगिक संस्थांचे संपूर्ण राष्ट्रीयीकरण करण्याचा जेव्हा हुकूम काढण्यात आला तेव्हा हा सारा भार संभाळण्याइतकी शासनयंत्रणेत ताकद नव्हती. मॉस्को आणि पेट्रोग्राड या शहरांव्यतिरिक्त अन्यत्र जो सरकारी नोकरवर्ग होता त्याला आपल्यावर पडलेल्या या नव्या जबाबदारीचा

अनुभव नव्हता. मिखाईल लारिन याने ही योजना तयार केली होती. लारिन हा मूळचा मेन्शेव्हिक. रशियातील अनेक उदारमतवादी पत्रांचा वार्ताहर म्हणून त्याने जर्मनीत वास्तव्य केले होते. तेथेच त्याने जर्मनीच्या आक्रमक समाजवादाचा अभ्यास केला. नियोजित अर्थव्यवस्थेचे गुणगान गाण्याचा लारिनला छंदच लागला. १९१७ च्या मार्चमध्ये रशियात क्रांती झाल्यानंतर लारिन मायदेशी परतला. या काळात त्याचा आणि लेनिनचा परिचय झाला आणि तो बोल्शेव्हिक पक्षाकडे खेचला गेला. रशियात समाजवाद अवतरला पाहिजे ही लेनिनची तळमळ होती आणि म्हणून त्याने समाजवादी पायावर रशियाची अर्थव्यवस्था उभारण्याची कामगिरी लारिन-कडे सोपविली. देशातील सर्व उद्योगधंद्यांचे राष्ट्रीयीकरण करण्याची कल्पना लारिन-चीच. त्याने या योजनेचा तपशील कागदावर उतरवून काढून तो लेनिनपुढे ठेवला. लेनिन या योजनेमुळे इतका भारावून गेला की ही योजना ताबडतोब राबविण्याचे त्याने ठरविले आणि त्यानुसारच राष्ट्रीयीकरणाचा हुकूम काढण्यात आला. आधीच महायुद्धामुळे आणि अंतर्गत यादवी युद्धामुळे रशियाच्या अर्थव्यवस्थेवर ताण पडला होता. त्यातच राष्ट्रीयीकरण जाहीर करण्यात आल्यामुळे उत्पादनवाढ क्षीण झाली आणि बोल्शेव्हिक राजवटीपुढे बिकट आर्थिक समस्या उभी राहिली.

लारिनच्या हुकमामुळे देशातील बरेचसे कारखाने बंद पडण्याच्या बेतात आले आहेत असे जेव्हा लायबरमानसारख्या तज्ज्ञाने लेनिनला सांगितले तेव्हा तो उत्तरला – ‘ होय, आम्हीही चुका करतो. परंतु चुका केल्याशिवाय कोणतीच क्रांती यशस्वी होत नसते. या चुकांमुळेच आम्ही शहाणे होत आहोत. या चुका आम्ही दुरुस्त करू शकतो याचंच आम्हाला समाधान वाटते. ’

लारिनच्या राष्ट्रीयीकरणाच्या प्रयोगाचे समर्थन करताना लेनिन म्हणाला, ‘ आम्ही क्रांती घडवून आणीत आहोत. कदाचित आमच्या हातात सत्ता फार काळ राहणारही नाही. परंतु आज आम्ही जो प्रयोग करीत आहोत त्याची इतिहासाला दखल घ्यावी लागेल आणि पुढे कधी काळी जर कोणी क्रांती केली तर त्याला आमच्या या प्रयोगापासून बरंच काही शिकता येईल. आज लारिनचा प्रयोग अनेकांना हास्यास्पद वाटत असेल. परंतु भावी क्रांतिकारकांना त्यापासून बरंच मार्गदर्शन होऊ शकेल. पॅरिस कम्यूनच्या धर्तीवर आम्ही सामाजिक अर्थव्यवस्था उभारायचा प्रयत्न करीत आहोत. ’

लारिनच्या समाजवादी अर्थरचनेच्या प्रयोगापायी बोल्शेव्हिक राजवटीने नागरि-कांचा कारखाने चालविण्याचा वा व्यापार करण्याचा अधिकार हिरावून घेतला होता. आणि त्याबरोबरच नवे उद्योगधंदे उभारण्याचेच नव्हे तर ताब्यात घेतलेले कारखाने चालविण्याचेदेखील बोल्शेव्हिक राजवटीत सामर्थ्य नव्हते. जर कोणी लहानसा कारखाना वा दुकान सुरू करण्याचा प्रयत्न केला तर लागलीच

त्याला प्रतिक्रांतिकारक ठरविण्यात येऊन ठार केले जाई. सर्वत्र सरकारीकरणाची घोषणा ऐकू येत होती. परंतु सरकारनियंत्रित व्यापार अस्तित्वात आलेला नव्हता. यामुळे मूळच्या आर्थिक संकटात अधिकच भर पडली. जीवनोपयोगी वस्तूंची चणचण जाणवू लागली. कारखान्याला कच्चा माल मिळेनासा झाला. औद्योगिक उत्पादनही मंदावत चालले. लोकांच्या हातात जो काही माल होता तोही बाजारपेठेतून अदृश्य झाला. यामुळे काळा बाजार फोफावला. सरकारी दुकानांत न मिळणारी वस्तू चढचा भावाने उपलब्ध होऊ लागली.

याचा व्हायचा तोच परिणाम झाला. चलनाची किंमत दरदिवशी घसरू लागली. शहरातून ग्रामीण भागाला उत्पादित मालाचा पुरवठा होत नसल्यामुळे शेतकरीवर्ग आपल्याजवळचे अन्नधान्य विक्रीस काढेना. शहरातील कामगारवर्गाला उपासमार जाणवू लागली. हे कामगारही मूळचे शेतकरीच होते. त्यामुळे सरकारी कारखान्यात काम करून मिळणाऱ्या मोबदल्यात पोट भरत नाही असे आढळून आल्यानंतर त्यांनी खेडेगावाकडे धाव घ्यायला सुरुवात केली. शहरे ओस पडू लागली. कच्चा मालही नाही आणि कामगारही नाहीत अशा परिस्थितीमुळे कारखाने बंद करण्याची वेळ येऊन ठेपली.

बराचसा कामगारवर्ग शहरे सोडून गेला असला तरीदेखील सरकारी नोकरवर्ग शहरातच होता. या नोकरांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था करणे भाग होते. त्यामुळे बोल्शेव्हिक राज्यकर्ते खेडेगावांमध्ये सैनिक धाडून त्यांच्याकरवी शेतकऱ्यांच्या घरांतील धान्य बाहेर काढीत आणि ते शहरात आणून त्यावर या नोकरवर्गाची गुजराण करीत. सैनिकांच्या बेमुर्वतखोर हस्तक्षपामुळे शेतकरी संतापत आणि ते आपल्याजवळ असलेल्या गावठी शस्त्रानिशी सैनिकांना प्रतिकार करीत. प्रत्येक खेडेगावामध्ये शेतकऱ्यांचे उठाव होत होते. शेतकऱ्यांचे रक्त सांडल्याशिवाय सैनिकांना धान्य मिळत नव्हते. त्यातून हे शेतकरी म्हणजे नुकतेच आघाडीवरून परतलेले निवृत्त सैनिक होते. त्यांच्याजवळ रायफली, मशिनगन, ग्रेनेड्स असली आयुधे होती आणि ती वापरण्याची कलाही त्यांना अवगत होती. त्यामुळे सैनिकांच्या आगमनाची चाहूल लागताच खेडेगावातील शेतकरी एकत्र येऊन या सैनिकांशी लढा देत. हा प्रतिकार काही वेळा इतका प्रखर असे की सैनिकांना हात हलवीत परतावे लागे. दुसऱ्या दिवशी ते आणखी कुमक घेऊन तेथे येत तेव्हा कोठे त्यांना शेतकरीवर्गाचा बीमोड करून धान्य-कोठारात प्रवेश करता येत असे. सैनिकांप्रमाणेच सरकारी अधिकारी नोटा घेऊन खेडेगावात येत. परंतु या कागदी चलनाला कोणतीही किंमत राहिली नसल्यामुळे शेतकरी पैशाच्या बदल्यात धान्य द्यायला तयार नसत. ‘धान्याच्या बदली आम्हाला जीवनोपयोगी वस्तू द्या’ अशी त्यांची मागणी असे. अर्थातच ती पुरविणे शक्य नसल्यामुळे अधिकाऱ्यांचा निरुपाय होई. मग ते धान्य-जप्तीचा हुकूम घेऊन पुन्हा खेडेगावात येत. या वेळी संतापलेला शेतकरीवर्ग त्यांच्यावर तुटून पडे.

उपासमारीमुळे रशियन जनता अक्षरशः वैतागून गेली होती.

बोल्शेव्हिक राज्यकर्त्यांच्या प्रयोगापायी आपल्याला हे हाल सहन करावे लागत आहेत या संतापामुळे शेतकरीवर्ग बोल्शेव्हिकविरोधी पक्षांना मदत करू लागे. काही ठिकाणी तर अशी गमतीची भाषा ऐकू येई की जमीनदारांकडून जमिनी ताब्यात घेणारा बोल्शेव्हिक पक्ष आपल्याला मान्य आहे, परंतु आपल्याजवळचे धान्यसाठे जबरदस्तीने काढून घेण्यासाठी लष्करी बळाचा वापर करण्याऱ्या कम्युनिस्ट पक्षाला मात्र आपला विरोध आहे. चिडलेला शेतकरीवर्ग पेरणी करेनासा झाला. आपल्या कुटुंबाला पुरेल एवढेच धान्य पिकविण्यात येऊ लागले. शहरवासीयांच्या हालअपेष्टांना सीमा उरली नाही.

एकदा मजूर आणि संरक्षण या खात्यातील अधिकाऱ्यांची बैठक भरलेली असताना लायबरमान म्हणाला, ' आपण असं जाहीर करावं की जे शेतकरी कारखान्यांसाठी आणि लोहमार्गासाठी लाकूड आणून देतील त्यांना सरकारकडून पाव पुरविला जाईल. ' लायबरमानच्या सूचनेला विरोध करण्यासाठी उभा राहिलेला अधिकारी म्हणाला, ' म्हणजे आधीच शहरातील लोक उपासमारीनं पीडलेले आहेत. त्यांचं रेशन आणखी कमी केलं तर हे लोक आपल्याविरुद्ध चिडून उठतील. '

या वेळी रिकोव्ह बोलायला उभा राहिला. तो म्हणाला ' अन्नधान्याची चणचण जाणवत असतानाही आपण लोकांकडून काम करून घेत आहोत ही परमेश्वरी कृपाच मानली पाहिजे. माणसं आपलं ऐकतील, पण आपल्या क्रांतीची महती लष्करातील घोड्यांना कशी कळणार ? घोडे क्रांतीचे शत्रू आहेत असं पाहिजे तर आपण म्हणू या. परंतु त्यांच्या दाणागोटयाची व्यवस्था केल्याशिवाय भागणार नाही. चार माणसं मारली की इतर लोक चटकन गप्प बसतात. पण चार घोडे मारून इतर घोड्यांना आपण कसं वठणीवर आणणार ?'

ही चर्चा भलत्या वळणावर जात आहे असे आढळून आल्यानंतर लेनिन उभा राहिला आणि म्हणाला, ' बस्स करा ही चर्चा. शेतकऱ्यांना पाव मिळतील अशी व्यवस्था व्हायलाच हवी. '

शेतकऱ्यांच्या सशस्त्र उठावामुळे होणारा रक्तपात, कारखाने बंद पडल्यामुळे निर्माण झालेली आर्थिक समस्या आणि अन्नधान्याच्या तुटवडयामुळे धुमसू लागलेला असंतोष या कारणांमुळे आपली राजसत्ता स्थिर ठेवण्यासाठी कोणत्याही मानवी मूल्यांचा विधिनिषेध नसणाऱ्या 'चेका'वर अवलंबून राहणे लेनिनला भाग पडले. या काळात तो पराकाष्ठेचा उद्विग्न आणि चिडचिडा झालेला होता. त्याचा एक सहकारी नागलोव्हस्की लिहितो– " सोव्हिएटच्या बैठकीत लेनिन कित्येक वेळा अकारण संतापत असे. पूर्वी असे होत नसे. प्रसंग कितीही बिकट असो, लेनिनची मनःशांती ढळली आहे असे पूर्वी दिसत नसे. परंतु १९१८–१९

या काळात तो साध्यासुध्या गोष्टींकरताही चिडत असे. एकेकाळचा हा अट्टल कटवाला पण आता तो आतून भेदरल्यासारखा दिसत होता. पूर्वी तो कोणीही विरोध करू लागला की गप्प बसून त्याच्याकडे उपहासाने हसत असे. आपल्या भोवतालचे सारेजण मूर्ख आहेत अशाच भावनेने तो वावरत असे. परंतु आता त्याचा संताप उफाळून वर येत असे. कधी कधी तो चिडून म्हणायचा, ' तुमच्यासारखे लोक मिळाल्यानंतर हे असेच व्हायचे. मी एकटा किती आणि कुठं पुरा पडणार ?"

१९१८ च्या नोव्हेंबरमध्ये रोमान मॅलिनोव्हस्की अकस्मात मॉस्कोमध्ये प्रकट झाला. तो लेनिनला क्रॅको येथे १९१५ मध्ये भेटला होता व त्यानंतर त्याचे काय झाले हे कोणालाच ठाऊक नव्हते. मॅलिनोव्हस्की मेला आहे असेच त्या वेळी लेनिनने जाहीर केले होते. परंतु १९१८ च्या नोव्हेंबरमध्ये मॅलिनोव्हस्की प्रकट होताच लेनिनने त्याला बोल्शेव्हिक पक्षाच्या न्यायासनासमोर आरोपी म्हणून उभे केले. मॅलिनोव्हस्कीवरील खटल्याचे कामकाज गुप्त रीतीने चालावे असा लेनिनचा हुकूम होता. तो स्वतः खटल्याच्या सुनावणीला हजर राही. बोल्शेव्हिक पक्षाच्या न्यायाधीशांनी आरोप वाचून दाखविल्यानंतर मॅलिनोव्हस्की म्हणाला, ' मी तुमच्याकडून दयेची अपेक्षा करीत नाही. मी झारशाहीतल्या ' ओखराना ' या गुप्त पोलिस संघटनेमध्ये काम केलं होतं ही गोष्ट मला नाकारायची नाही. मला ते काम का करावं लागलं त्याची कारणे कितीही खरी असली तरी ती तुम्हाला पटणार नाहीत हे मला माहीत आहे आणि म्हणूनच माझ्या नशिबात काय वाढून ठेवलं आहे ते मी केव्हाच ओळखलं आहे. तुम्ही द्याल ती शिक्षा मला मान्य आहे.'

' तू पैशाच्या अपेक्षेनंच ' ओखराना 'चं काम करीत होतास ही गोष्ट खरी आहे ना ?' न्यायाधीशाने विचारले.

' मी जर त्यांचे पसे घेतले नसते तर त्यांना माझा संशय आला असता. मी त्यांचं काम प्रामाणिकपणाने करीत आहे असा देखावा करणं भाग होतं.'

' पण तू आपल्या काही सहकाऱ्यांना पकडून का दिलंस ?'

मॅलिनोव्हस्की गप्प होता. लेनिन समोरच बसलेला होता. मॅलिनोव्हस्कीचा वकील म्हणाला, ' माझ्या अशिलाला जर वेळीच नीट मार्गदर्शन मिळालं असतं तर तो ' ओखराना 'मध्ये सामील झाला नसता.'

लेनिनला हा बचाव बिलकुल मान्य नव्हता. मॅलिनोव्हस्कीने पैशाच्या आशेनेच पक्षाचा द्रोह केला याबद्दल त्याची खात्री होती. न्यायाधीशांचे मतही तसेच पडले आणि त्यांनी त्याला फाशीची शिक्षा सुनावली. ती शिक्षा ऐकताच मॅलिनोव्हस्कीचे पाय कापू लागले. लेनिन आपल्यावतीने दोन–चार शब्द बोलेल अशी त्याची कल्पना होती. परंतु लेनिन तेथून काहीही न बोलता बाहेर पडला. दुसऱ्या दिवशीच्या ' इझवेस्तिया 'मध्ये बातमी होती– ' काल रात्री मॅलिनोव्हस्कीला गोळ्या

घालून ठार करण्यात आले.' मॅलिनोव्हस्की-प्रकरणाचा संपूर्ण वृत्तान्त कधीच बाहेर आला नाही.

आपण आपले लष्करी सामर्थ्य वाढविले पाहिजे असे लेनिनचे मत होते. सोव्हिएटच्या केंद्रीय समितीच्या प्रत्येक बैठकीत तो आपले हे मत आग्रहाने मांडत असे. तो म्हणायचा, 'आपल्या भोवताली साम्राज्यवादी राष्ट्रं असताना आपल्याला दुर्बळ राहून चालणार नाही. शेवटी एक तर ती राष्ट्रं तरी जिवंत राहणार आहेत किंवा आपण तरी विजयी होणार आहोत, आणि अशी निर्णायक लढाई होण्यापूर्वी आपण जर सामर्थ्यसंपन्न झालो नाही तर रशियातील बोल्शेव्हिक राजवट कोसळायला फार वेळ लागणार नाही हे लक्षात ठेवा.'

१९१९ च्या मेमध्ये जनरल युडेनिच याने बोल्शेव्हिक राजवटीविरुद्ध बंड पुकारून पेट्रोग्राडच्या वेशीपर्यंत धडक मारली. झिनोव्हेव्हने कामगारांची लष्करी संघटना उभारण्याचा प्रयत्न करून पाहिला. परंतु त्यात त्याला यश आले नाही. पेट्रोग्राड युडेनिचच्या हाती जाते की काय अशी परिस्थिती निर्माण झाली होती. युडेनिचच्या उठावाचा फायदा घेऊन दुसऱ्या दिशेने फिनलंडमधील सैनिकही आपल्या विरुद्ध उठतील अशी झिनोव्हेव्हला भीती वाटू लागली.

झिनोव्हेव्हने आपल्या सर्व सहकाऱ्यांना स्मोस्कीमध्ये बोलावून सांगितले, 'तुम्ही सारेजण येथेच थांबा. मी कोणालाही बाहेर जाऊ देणार नाही. आपण येथूनच युडेनिचच्या प्रतिकाराची व्यवस्था करू या.'

झिनोव्हेव्हचे हे वर्तन जेव्हा लेनिनला कळले तेव्हा तो खूप चिडला. त्याने ट्रॉटस्कीला पेट्रोग्राडकड धाडले. इतकेच नव्हे तर मध्यरात्रीची वेळ असूनही गानेटस्कीला फोन केला— 'भलत्या वेळी तुला उठवत आहे म्हणून माफ कर. पण काम तसंच तातडीचं आहे. पेट्रोग्राडच्या रोखानं निघालेला युडेनिच लवकरच तिथं येऊन पोचेल. पेट्रोग्राडमधल्या आमच्या मूर्खांना युडेनिचचा कसा बंदोबस्त करायचा याचं बिलकुल ज्ञान नाही. मी येथून सैन्य पाठवीत आहे. परंतु इथलं सैन्य येण्यापूर्वी युडेनिच शहरात घुसला तर तिथं जी कागदाची गिरणी आहे तिला आग लावून टाका.'

पेट्रोग्राडमधील कागदाची गिरणी जाळून टाकली तर नोटा कोठे तयार करावयाच्या हा प्रश्न होता. परंतु लेनिनला आता त्याची पर्वा नव्हती. ती गिरणी युडेनिचच्या हातात पडता कामा नये याचीच त्याला काळजी लागून राहिलेली होती.

ट्रॉटस्की पेट्रोग्राडमध्ये येऊन पोचताच वातावरण एकदम बदलले. त्याने ताबडतोब पक्षकार्यकर्त्यांची बैठक बोलावून एकेकाला प्रश्न विचारावयास प्रारंभ केला. तो आपल्या चिटणिसाला म्हणाला, 'हे जी उत्तरं देतील ती नीट उतरून घे.'

ट्रॉटस्की झिनोव्हेव्हच्या कचेरीत उभा राहून एकेकाची जबानी घेत होता. ट्रॉटस्कीचा हा रौद्रावतार पाहून पेट्रोग्राडमधल्या लष्करी दळणवळणखात्याचा प्रमुख आराराटोव्ह हा तर भेदरून गेला. ट्रॉटस्कीने आवाज उंचावत त्याला विचारले, 'फिनलंडहून इथं आपले सैन्य आणायला किती वेळ लागेल ?'

'चोवीस तास !'

'काय ! तू युडेनिचचा हस्तक असल्यासारखाच बोलतो आहेस.' ट्रॉटस्कीच्या संतापाला सीमा राहिली नव्हती. पेट्रोग्राडमधला चेकाचा प्रमुख पावलुनोव्हस्की याला उद्देशून ट्रॉटस्की म्हणाला, 'ताबडतोब आराराटोव्हला अटक कर. इतकंच नाही तर पेट्रोग्राडच्या संरक्षणाची जबाबदारी ज्यांच्या ज्यांच्यावर सोपविली होती त्या सर्वांना गोळचा घालून ठार केलं पाहिजे असा माझा तुला हुकूम आहे.'

पावलुनोव्हस्कीने ट्रॉटस्कीची आज्ञा तंतोतंत पाळली. हा सारा प्रकार पाहिल्यानंतर झिनोव्हेव्हने युडेनिचच्या प्रतिकाराची सिद्धता केली. पेट्रोग्राड युडेनिचच्या हाती पडले नाही. पण त्यासाठी लेनिनसारखी देहदंडाची भाषा बोलणाऱ्या ट्रॉटस्कीला तेथे यावे लागले होते.

याच काळात लेनिनने आपल्या पक्षाचेही नाव बदलले होते. बोल्शेव्हिक या शब्दाचे सोशल डेमोक्रॅटिक पक्षाशी नाते असल्यामुळे सत्ता हाती आल्यापासून लेनिनला त्या नावाचा तिटकारा आला होता. ९ मार्च १९१८ रोजी बोल्शेव्हिक पक्षाची बैठक भरून तीत यापुढे हा पक्ष कम्युनिस्ट पक्ष म्हणून ओळखला जाईल असा ठराव मंजूर करण्यात आला. रशियात कम्युनिस्ट पक्षाशिवाय कोणताही पक्ष आस्तित्वात राहता कामा नये यादृष्टीने लेनिन प्रारंभापासूनच पावले टाकत होता. पददलित जनतेच्या हुकूमशाहीच्या नावाखाली त्याला कम्युनिस्ट पक्षाची एकतंत्री सत्ता प्रस्थापित करायची होती.

शतकरी आणि कामगार यांच्या प्रतिनिधींनी निवडलेल्या कार्यकारिणीकडे देशाचा राज्यकारभार सोपविण्यात आलेला आहे हे लेनिनचे विधान केवळ देखाव्यापुरते खरे होते. कारण प्रत्यक्षात ही केंद्रीय सोव्हिएट कार्यकारिणी लेनिनप्रणित कम्युनिस्ट पक्षाच्या हातचे बाहुले बनली होती.

१९१९ मध्ये कम्युनिस्ट पक्षाच्या वार्षिक मेळाव्यामध्ये बोलताना झिनोव्हेव्ह म्हणाला, 'सर्व अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय महत्त्वाच्या प्रश्नांबाबतचं धोरण आपला पक्षच ठरवितो आणि त्याची कार्यवाही सोव्हिएटमार्फत केली जाते. आपली कार्यकारिणी हे कार्य इतक्या हुशारीने करते की आपण कम्युनिस्ट पक्षाचे ऐकत आहोत याची सोव्हिएट प्रतिनिधींना जाणीवही होत नाही. आपला पक्ष अतिशय जागरूक आहे. म्हणूनच लोकांच्या दृष्टीने जरी देशाचा राज्यकारभार सोव्हिएटच्या हाती असला तरी प्रत्यक्षात आपला पक्षच देशाची सर्व सूत्रे संभाळीत आहे.'

या बैठकीनंतर पक्षाच्या केंद्रीय कार्यकारिणीवर सर्वव्यापी नियंत्रण ठेवणारी राजकीय समिती स्थापन करण्यात आली. या समितीत लेनिन, ट्रॉटस्की, कामेनेव्ह, बुखारिन आणि स्टॅलिन यांचा समावेश करण्यात आला. पुढल्या वर्षी राजकीय समितीतील सदस्यांची संख्या सातावर नेण्यात आली. यात पहिल्या पाच सदस्यांशिवाय प्रेओब्राझेन्स्की आणि सेरेब्रिआखोव्ह यांना घेण्यात आले. लेनिनच्या मृत्यूनंतर स्टॅलिनने आपल्या या प्रारंभीच्या पाचही सहकाऱ्यांचा निःपात केला.

सोव्हिएट सरकार आणि कम्युनिस्ट पक्ष यांचे नाते विशद करताना १९२० मध्ये लेनिनने लिहिले आहे–' आपला पक्ष इतका मोठा आहे की सर्वांना शासनयंत्रणेत सहभागी करून घेता येणार नाही. शिवाय आपल्या पक्षातही सत्तेकरिता धडपडणारे अनेक बदमाष आहेत. त्यांना खरं म्हणजे गोळ्या घालून ठार मारायला हवं. आपला पक्ष या संधिसाधू लोकांच्या हाती जाऊ नये म्हणून पक्षाची सर्व सूत्रे एकोणीसजणांच्या केंद्रीय समितीकडे राहतात. परंतु केंद्रीय कार्यकारिणीतही मतभेद होण्याचा संभव असल्यामुळे आपल्या विश्वासातील सात सदस्यांची राजकीय समिती स्थापन करण्यात आली आहे आणि तिच्यामार्फत राज्यकारभार केला जाईल. '

झिनोव्हेव्हने आपल्या भाषणात लेनिनची भूमिका अधिक स्पष्ट केली. तो म्हणाला, ' रशियात कम्युनिस्ट पक्षाशिवाय कोणताच पक्ष कायदेशीर नाही. आमच्या राजकीय विरोधकांना कोणतेही स्वातंत्र्य देण्यास आमचा सक्त विरोध आहे. आमच्या हातातून सत्ता हिसकावून घेण्याचा प्रयत्न करणाऱ्याला आम्ही जगू देणार नाही. मेन्शेव्हिक आणि सोशॅलिस्ट रेव्होल्युशनरी या पक्षांच्या कार्यकर्त्यांच्या तोंडांना आम्ही जाड कुलपं ठोकली आहेत. त्याशिवाय आम्हाला पर्यायच नव्हता. पददलितांच्या शत्रूंना नष्ट केल्याशिवाय पददलितांची हुकूमशाही अस्तित्वातच राहू शकत नाही. विरोधकांच्या बाबतीतला आमचा हा कठोर दृष्टिकोण आम्हाला केव्हा बदलता येईल हे सांगणं अशक्य आहे.'

श्रमिक जनतेच्या नावाने सत्ता हस्तगत करणाऱ्या लेनिनने अल्पावधीतच आपल्या सर्व राजकीय विरोधकांना नेस्तनाबूत करून कम्युनिस्ट पक्षाची एकतंत्री राजवट प्रस्थापित केली.

या राजवटीला लोकशाही कधीच मंजूर नव्हती. (क्रमशः)

दूरध्वनी ] शरीर आणि मन भक्कम बनविण्यासाठी [ ५३५

स्त्रीपुरुषांच्या सर्व अवयवांची डौलदार वाढ

व स्नायूंच्या मजबुतीकरिता

अर्कशालानिर्मित

मकरध्वजयुक्त च्यवनप्राश

एकमेव शक्तिवर्धक । तज्ज्ञांनी प्रशंसिले आहे ।

आयुर्वेदीय अर्कशाला लि., सातारा

# शंतनुरावांची मौलिक सूचना

सातव्या राष्टीय बुद्धिबळ-स्पर्धेतील पहिल्या सहा विजेत्या खेळाडूंचा गौरव-समारंभ सुविख्यात उद्योगपती श्री. शंतनुराव किर्लोस्कर यांच्या अध्यक्षतेखाली थाटामाटात पार पडला. त्या प्रसंगी सौ. यमुनाई किर्लोस्कर यांच्या हस्ते नासिर-अल्ली (उत्तर प्रदेश) ५०० रुपये व फेडरेशनचे सुवर्णपदक, मॅन्युअल एरन (मद्रास) ३०० रुपये, महंमद हसन (आंध्र प्रदेश) २०० रुपये, रामचंद्र सप्रे (महाराष्ट्र) १०० रुपये, श्रीकृष्ण साखळकर (महाराष्ट्र) ५० रुपये व फसक अल्ली (आंध्र प्रदेश) यांना २५ रुपये अशी रोख बक्षिसे देण्यात आली. येत्या ऑक्टोबर महिन्यात स्वित्झलंड येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ-स्पर्धेत वरील सहा खेळाडूंचा समावेश करण्यात आला आहे. या बुद्धिबळपटूंना उद्देशून श्री. शंतनुराव किर्लोस्कर यांनी छोटेसे पण छानसे अध्यक्षीय भाषण केले. श्री. शंतनुराव म्हणाले, "आता नासिरअल्ली आणि एरन ही लढत संपलेली आहे. यानंतर आमचे सहा खेळाडू एकत्र बसून बुद्धिबळातील डावपेचांची देवघेव करतील व परदेशांत जाणाऱ्या भार-तीय संघाचा दर्जा एकत्रितरीत्या वाढवतील," किर्लोस्कर यांनी सांगितले की, "व्यक्तीच्या विकासाबरोबरच संघाचे सामर्थ्य भारतीय खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय क्षितिजावर वाढवीत नेले पाहिजे." या संदर्भात ऑस्ट्रेलियात गेलेल्या भारतीय क्रिकेट संघाच्या पीछेहाटीचा त्यांनी उल्लेख केला.

तसे पाहिले तर बुद्धिबळ या खेळाशी विशेष संबंध नसताना श्री. शंतनुराव यांनी जे वरील तळमळीचे उद्गार काढले त्याला एक वेगळाच अर्थ आहे असे मला वाटते. भारतामधील प्रत्येक खेळाकडे आता समाजामधील प्रतिष्ठित पुरुष आस्थे-वाईकपणे पाहू लागले आहेत. खेळ हा जीवनाचा एक आवश्यक भाग होऊ पाहात आहे. आणि अशा वेळी जर पन्नास कोटी लोकसंख्येचे प्रतिनिधित्व करणारे सहा खेळाडू संघभावनेने खेळणार नसतील तर त्यांच्यासंबंधी बोलण्याचा प्रत्येक भारतीय नागरिकाला एक जरूर हक्क निर्माण होत आहे. त्या दृष्टीने शंतनुरावांच्या सूचनेचा गांभीर्यानेच विचार केला पाहिजे. परदेशांतील दौरे ही आता केवळ तात्पुरती मौज राहणार नाही. तेथील तुमच्या वैयक्तिक पराक्रमाचे आणि सांघिक कौशल्याचे पारायण आम्ही करणार आहोत. योग्य वेळीच योग्य इशारा देऊन शंतनुरावां-सारख्या उद्योगपतींनी भारतीय खेळांच्या प्रकृतीवर नेमके बोट ठेवले आहे.

**क्री डां ग ण**

# क्रीडा-लेखनांना इशारा

" आपण कोण ?"

" मी मनोहर रेगे. "

" या बसा. "-किलकिल्या डोळ्यांनीच माझे स्वागत करण्यात आले. सुरुवात तितकीशी समाधानकारक झाली नाही याचा पडताळा मला लगेच आला.

" रेगे, नुसते तुम्ही क्रिकेटवर काय लिहीत बसला आहात ?" दैनिक ' मराठा ' वृत्तपत्राचे सहसंपादक आणि गेली चाळीस वर्षे सतत हुकमी क्रीडा-लेखन करणारे सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. र. गो. सरदेसाई जवळजवळ माझ्यावर गुरकलेच.

" का, तो आंतरराष्ट्रीय खेळ नाही का ?"

" कुणी सांगितले तुम्हाला की क्रिकेट हा खेळ आंतरराष्ट्रीय आहे म्हणून ? अहो गेल्या सहाशे वर्षांत सात देश फक्त क्रिकेट खेळत आले आहेत त्यात आपला नंबर शेवटून तिसरा आला आहे. तो कुठला आला आहे आंतरराष्ट्रीय खेळ ! कॅनडा आणि ब्रह्मदेश ही राष्ट्रेसुद्धा तो खेळू इच्छित नाहीत. अमेरिका-रशियांचे तर सोडाच. आणि तुमचे क्रिकेटियर्स ऑस्ट्रेलियात सध्या काय करतात पाहिलेत ना ! पस्तीस वर्षांच्या नाडकर्णीचे कौतुक तुम्ही करीत बसता पण अठरा-एकोणीस वर्षांच्या शीहन-ग्लीसन यांचा पराक्रम तुम्ही पाहिलात का ? नाडकर्णी वाईट खेळतो असे नाही. पण खेळात तारुण्याला आणि शारीरिक तन्दुरुस्तीला अधिक महत्त्व आहे. तुमचे प्रा. देवधर बघा आज पंचाहत्तरी उलटून गेली तरी टुणटुणीत आहेत.

सरदेसाई सांगत होते, " मिहीर सेनने इंग्लिश खाडी पोहोण्यापूर्वी तेलकट मांस सेवन केले. अठराव्या मैलाला त्याची पोटदुखी सुरू झाली. दुसऱ्या दिवशी उकडलेले मांस त्याने खाल्ले तेव्हा ४० मैल तो पोहून गेला. नाहीतर तुमचे भारतीय क्रिकेट-पटू गोव्याची कढी ऑस्ट्रेलियात भुरकताहेत. कढी पिऊन कधी पन्नास धावा तरी होतील का ?"

र. गों. चा बिनतोड युक्तिवाद मान्यच करावयास हवा होता. समोरच्या १० जानेवारीच्या हिंदूतील " नंदू नाटेकरांना थायलंडचे पारितोषिक मिळाल्याचे " दाखवून सरदेसाई पुढे म्हणाले, " नाटेकरांबद्दल तुम्ही लिहा. ८० देश ज्या ' डेव्हिस कप ' टेनिस स्पर्धेत भाग घेतात तो खरा आंतरराष्ट्रीय खेळ. त्यात भारत गेल्या वर्षी दुसरा आला. त्याबद्दल लिहा. कृष्णन गेला तर मुकर्जी आहे, लाल आहे, मिश्रा

म नो ह र रे गे

आहे. तुमच्या क्रिकेटमध्ये काय आहे ? सरदेसाई–बोर्डेचा काय पराक्रम दिसला तुम्हाला ? पराभव मी मान्य करतो हो, पण हा क्रिकेट संघ गेली ३५ वर्षे मारच खातो आहे आणि नुसती बेअब्रूच घेऊन भारतात परतत आहे. हा खेळ बंद केला पाहिजे. तसा विचार मी परवा नाशिकच्या सभेत मांडला. नंतर लोक म्हणाले असे आम्हाला आजपर्यंत कुणी सांगितलेच नाही. तुम्हा क्रिकेट-लेखकांचे हे काम आहे. ऊठसूट तुम्ही क्रिकेटवर लिहिता. मग ती लहान पोरं सकाळी उठली की पहिला रेडिओ लावून कळत नसलं तरी कॉमेंटरी ऐकत बसतात. "

## दुर्लक्षित खेळ

नंतर स्वतःला सावरून मी म्हणालो, " पण क्रिकेटमध्ये आयुष्यातील सुखदुःखे प्रतिबिंबित होतात. छोटेसे जीवनच आहे ते ! "

" इतर खळांत होत नाहीत का ?" अहो तो विलसन जोन्स–बिलियर्ड पटू-दोनदा जागतिक प्रावीण्य त्याने संपादले. पण तुम्ही कुठे लिहिलेत का ? आशियाई विजेता कुमार गोरे व मिश्रा त्यांच्यासंबंधी कुठे तुम्ही उल्लेख केलात का ? भारताची जेथे प्रतिष्ठा आहे त्याबद्दल लिहा की !"

" साहेब, मला असं सांगा की कोणती मूलभूत उद्दिष्टे घेऊन मी लिहू ?" मी विचारले.

तेव्हा श्री. र. गो. सरदेसाई उत्तरले, " भारत देश ज्या खेळात प्रगत होत आहे त्यासंबंधी लिहा. हॉकीवर लिहा. टेनिस-फुटबॉलवर लिहा. आज आपली आर्थिक परिस्थिती चांगली नाही. म्हणन देशाचे हित लक्षात घेऊन लिहा. कमी परदेशी चलनाच्या खेळासंबंधी लिहा. जे जे चांगले होत आहे त्याचा प्रामुख्याने उल्लेख करा. नव्या पिढीवर त्याचा चांगला परिणाम होईल. चांगले लिहिता तुम्ही. म्हणून सांगतो मी तुम्हाला !"

वस्तुतः श्री. र. गो. सरदेसाई यांची व माझी ती पहिली भेट होती. असे काही ते बोलतील याची मी अपेक्षाच केली नव्हती. साठी उलटलेल्या सरदेसाईंची अधिकारवाणी एका अर्थी काळजाचा ठाव घेऊन गेली. अब्रूचे धिडवडे निघाले तरी आम्ही क्रिकेटचे रकानेच्या रकाने भरतो हे अगदी खरे होते कोणी तरी या चाललेल्या प्रकाराला तोंड फोडणे आवश्यकच होते.

श्री. सरदेसाई काही निराशावादाने बोलत नव्हते. त्यांच्या विचारांना काही एक निश्चित बैठक होती. आणि त्यांनी ती सप्रमाण माझ्यासमोर मांडून दाखविली. माझ्याकडून त्यांच्या काही अपेक्षा होत्या म्हणूनच इतक्या कळकळीने आणि मोकळेपणाने त्यांनी मला सुनावले. जुने-नवे क्रीडा-लेखक श्री. सरदेसाई यांच्या उद्गारांचा तौलनिक बुद्धीने अभ्यास आणि उपयोग करून घेतील अशी आशा, नव्हे खात्रीच आहे मला.

# कबड्डीची व्यवस्थापकीय यंत्रणा

इंदूरच्या अखिल भारतीय कबड्डी स्पर्धेत महाराष्ट्र संघाच्या महिला व्यवस्थापिका श्रीमती सुहासिनी केळकर होत्या. वस्तुतः त्या महाराष्ट्राच्या माजी कर्णधार पण केवळ महिला खेळाडूंवर जुजबी देखभाल करण्यापलीकडे त्यांना काही अधिकार नव्हते. खेळाडूंनी वेळच्यावेळी उठून दात घासले का आणि गरमगरम चहा प्यायला का या पलीकडे त्यांच्या अधिकाराचे क्षेत्र विस्तृत नव्हते ही गोष्ट मला विशेषत्वाने खटकते. औरंगाबादच्या राज्यसोहळ्यात अध्यक्षपदावरून पद्मश्री पु. ल. देशपांडे म्हणाले की येथील महिला कबड्डीपटूंचा अप्रतिम खेळ पाहण्यासाठी महात्मा फुले, लोकाग्रणी आगरकर आणि महर्षी कर्वे हवे होते. पण यांपैकी एकजण जरी इंदूरला उपस्थित राहिले असते तरी त्यांनी आपल्या कपाळावर हात मारून घेतला असता. स्त्रियांच्या स्वतंत्रतेसाठी जन्मभर आपण झगडलो त्याचे हेच फळ का असे त्यांनी स्वतःला अनेकवार विचारले असते.

महाराष्ट्राच्या स्त्री-पुरुष संघांचे खरे व्यवस्थापक होते श्री. वसंतराव कोलगावकर. कबड्डीवरील त्यांचा अधिकार मोठा, अनुभव दांडगा त्याबद्दल दुमत होण्याचे कारणच नाही. पण त्यांची शिस्त फार करडी होती.आपल्या मनाप्रमाणेच क्रीडांगणावर आणि त्याबाहेर सर्वांनी वागले पाहिजे हा त्यांचा कटाक्ष. पण सामन्यांवर त्याचा परिणाम चांगलाच झाला नाही. खेळाडू बेचैन व काही एका मानसिक दडपणाखाली सतत वावरत असत. महिला व्यवस्थापिका केळकर यांना खेळाचे तंत्र अवगत असूनही कर्णधाराशी चर्चा करण्यास मोकळीक नव्हती. त्यामुळे कधीच खेळामधील उत्तमांगासंबंधी (फायनल पॉइंट्स) त्या खेळाडूंशी चर्चा करू शकत नव्हत्या. एका सामन्यात तर संघनायिका लीला फडके यांना मध्यंतरानंतर राखीव ठेवण्यात आले. पण श्रीमती केळकर त्याविरुद्ध काहीच आवाज उठवू शकल्या नाहीत. पुरुष व्यवस्थापकांची ही करडी शिस्त म्हणावयाची की संकुचित मनोवृत्ती समजावयाची पण एवढेच म्हणावेसे वाटते की, निवड करताना महाराष्ट्राचा विचार झाला नाही. खेळाडूंनाही स्वतःचे डोके असते. त्यांच्या मनातही काही कल्पना असतात. मनमोकळी चर्चा करूनच प्रत्येक सामन्यात डावपेच आखले गेले पाहिजेत. आणि अंतिम निर्णय कप्तानानेच घेतला पाहिजे; इंदूरच्या सामन्यात हे झाले नाही, निदान दिसले नाही.

○

# रंगभूमी

# झाला अनंत हनुमंत

तेंडुलकरांचे नाटक म्हणजे वेगळेपण हे आलेच. त्यांचे नवे नाटक 'झाला अनंत हनुमत' याला अपवाद नाही. लोकविलक्षण विषय आणि जबरदस्त आशय असलेले हे नाटक अस्सल आहे, जिवंत आहे, उघडचा-नागडचा व्यवहाराने, वास्तवाने घेरलेल्या एका पापभीरू माणसाची ही ताकदवान कथा आहे.

अनंत हनुमंत कुलकर्णी हा साधा, भोळा-भाबडा जीव. पापभीरू. गोमाशीसारखा चाकोरीला घट्ट चिटकून राहणारा. परंतु त्याच्या या साध्या,सरळ जीवनात विलक्षण चमत्कार घडतो, दोन पायांनी रस्ता तुडवत ऑफिसला जाणारा हा अनंत हनुमंत चक्क उडू लागतो. नेभळट, बावळट, यःकश्चित समजल्या जाणाऱ्या अनंताकडे पाहण्याची नातेवाइकांची, जगाची दृष्टीच पार बदलून जाते. 'जगाचेच गणित चुकलंय' असे म्हणणारा आणि योग्य संधीची वाट पाहात बसलेला अनंत कुलकर्णीचा स्वार्थी मेहुणा यशवंत या चमत्काराला बाजारी स्वरूप देऊ पाहतो. उड्डाणाचा कार्यक्रम करून भरपूर पैसे मिळवायचा बेत तो आखतो. आपल्याला प्राप्त झालेल्या

व्यवहारी घराण्यांच्या 'गायकी'चे आडाखे वेगळे असतात. तेंडुलकर घराण्यांच्या गळ्यातून, ते सूर बाहेर पडणे कठीणच.



सौ. मालती पेंढारकर : गणेश सोळंकी

दैवी शक्तीचा मानवी हितासाठी वापर करावा असे अनंत कुलकर्णीला वाटते. पण त्याच्या भोवतालचे जग त्याला तसे करू देत नाही. यशवंता तर प्रसिद्धीच्या पाठीमागे लागतो. प्रेस कॉन्फरन्स बोलावतो आणि अनंत कुलकर्णी ब्रेबॉर्न स्टेडियमवर उड्डाण करणार असल्याचे घोषित करून टाकतो. बिचाऱ्या अनंताचे मन तडफडते. कळवळते. तो चक्रावून जातो. त्याचे नवजात पोर पांगळे असते. पैसा मिळाला तर त्या पोरावर उपचार करता येतील, त्याला पायाचे पंख फुटतील, त्याला चालता करता येईल हे त्याला सांगण्यात येते. आपल्यासाठी नाही तरी निदान आपल्या पोरासाठी तरी उड्डाण करावे. या विचाराने तो अखेरीस उड्डाणासही तयार होतो. नेत्यांची भाषणे होतात. सारी जनता जमा झालेली असते. अनंत हनुमंत आकाशात झेप घेतो. ध्वनिक्षेपकावर त्याच्या या विक्रमी उड्डाणाचे रसभरित वर्णन निवेदक करत असतो. परंतु अघटित घडते. व्यवहारी जगाला वैतागलेला अनंत कुलकर्णी अस्मानात झेप घेतो ती कायमचीच. पुन्हा तो खाली येत नाही. जगापासून दूर, उंच, शांत ठिकाणी त्याचे मन सुखावते. एकच शल्य त्याला बोचत असते. पगार घेऊन घरी येत असता वाटेत एक इसम तुजजवळ जे काय असेल ते मला दे असे सांगतो.

त्या वेळी तो त्याला आपले पाकीट देतो. परंतु वेंधळेपणाने पैशाचे पाकीट देण्या-ऐवजी बिलांचे पाकीट दिले जाते. तो माणूस भेटला तर त्याला पैशाचे पाकीट द्यायचे अशी त्याची मनापासून इच्छा असते. वर गेल्यावर त्या भाबड्या जीवाच्या काळजात खंत उरते ती एवढीच. तो माणूस न भेटल्याची !

तेंडुलकरांनी ही सारी कथा एका कथेकरीबुवाचे निमित्त घेऊन त्याच्याकडून वदविली आहे. पोटाची खळगी भरण्यासाठी देवनामाचे आख्यान मांडणाऱ्या पंढरी-नाथाला देव हा चमत्कार दाखवतो. 'नॅरेशन'ची ही पद्धत आपल्याला एकदम मान्य. पात्रे जे बोलू शकत नव्हती परंतु लेखकाला मात्र ते तर सांगावयाचे होते. या पद्धतीमुळे लेखकाला ते सहज साध्य झाले आहे. तेंडुलकरांचा देव भलताच 'मॉडर्न' आहे. कीर्तनाला तो 'वन मॅन शो' म्हणतो आणि 'पंढरी'ला आज गल्ला किती जमला ? असेही विचारतो. देव आणि पंढरी यांचा हा संवाद कथानकाच्या उभारणीत महत्त्वाचे काम बजावतो.

तेंडुलकरांच्या बहुतेक नाटकांत खलनायक ठरलेला असतो. मध्यमवर्गीय परिस्थिती ही कायम खलनायकाची भूमिका त्यांच्या नाटकांतून बजावते. सभोवतालच्या लोकांपेक्षा काही तरी वेगळे करू पाहणारा, मध्यमवर्गीयातला इसम आणि त्याला ते करण्यास प्रतिबंध करणारी परिस्थिती असा संघर्षाचा मामला त्यांच्या बहुतेक नाटकांतून आढळतो. एक हट्टी मुलगी; मी जिंकलो, मी हरलो ही नाटके या संदर्भात लक्षात घेण्याजोगी आहेत, 'झाला अनंत हनुमंत'चा तोंडावळा चमत्काराचा असला तरी त्याच्या आत खदखदणारा संघर्ष नेमका हाच आहे. विलक्षणपणा प्राप्त झालेला अनंत कुलकर्णी आपल्या अंगच्या दैवी शक्तीचा वापर मानवी हितासाठी करू पाहतो, परंतु त्याच्या आसपासची माणसे व परिस्थिती त्याला तसे करू देत नाहीत असा हा संघर्ष आहे. पहिल्या अंकात हा संघर्ष तेंडुलकरांनी चांगलाच फुलविला आहे. परंतु पुढच्या दोन अंकांत मात्र त्यांना समतोल राखता आलेला नाही. अनंत हनुमंत कुलकर्णीला भेटायला येणारे लोक, पत्रकार परिषद यांचा थोडा, अतिरेकी गोंधळ दुसऱ्या अंकात आहे तर तिसऱ्या अंकात ब्रेबॉर्न स्टेडियमवरील विविध नेत्यांच्या भाषणांचा जल्लोश आहे. तेंडुलकरांचा विनोद हा अगदीच बाष्कळ शाब्दिक कोट्यांकडे झुकणारा नसला तरी तो फार उंचीही गाठू शकत नाही. त्यामुळे हे दोन्ही अंकांतले प्रसंग तितकेसे रंगत नाहीत. हे दोन्ही प्रसंग इतके तपशीलवारपणे तेंडुलकरांनी लिहिले आहेत, की त्यामुळे नाटकाच्या कथानकातला मूळ संघर्ष गुदमरून जातो. जगावर कोरडे ओढ-णारे हे नाटक 'सिरियस' बनतच नाही. अनंत कुलकर्णी आकाशात उंच जातो व तो खाली येत नाही हे कळल्यावर त्याची पत्नी ढसढसा रडते हा प्रसंगही प्रेक्ष-कांना स्पर्शून जात नाही याचे कारण म्हणजे आधीच्या विनोदी प्रसंगाचा झालेला परिणाम होय.

पहिला अंक एकदम चोख आहे. तेंडुलकरांनी मोजकेच धारदार संवाद लिहिले आहेत. सगळ्या पात्रांचे स्वभाव, त्यांचे मनोव्यापार या संवादांतून व्यक्त होतात, पगारासकट पती घरी यावेत, असे म्हणणारी व पुढचा महिना कसा कंठावयाचा याच्या चिंतेत असलेली अनंताची पत्नी, आपल्या अंगच्या कर्तृत्वाला अजून संधीच मिळालेली नाही असे म्हणणारा ' अँग्री यंग मॅन ' यशवंता, चुणचुणीत मंदा, सदान्-कदा स्वप्निल - सृष्टीत वावरणारी विमा या साऱ्या व्यक्तिरेखा स्पष्ट प्रभावी आहेत.

## मानकरी

अनंताची भोळीभावडी भूमिका गणेश सोळंकी यांनी केली आहे. चार्ली चॅप्लिनच्या ' ट्रॅम्प ' सारखे ते वाटत होते. व्यवहारी जगात तडफडणारा अनंत त्यांच्या हालचालीतून ठायीठायी व्यक्त होत होता. पत्रकार चहा–चिवड्याचा समाचार घेत असता त्यांनी केलेले भाषण – स्वगतच ते – ठसा उमटवून गेले. गणेश सोळंकी खऱ्या अर्थाने अनंताचे जिणे जगत आहेत असे वाटते, इतका त्यांचा अभिनय अस्सल होता. यशवंताची भूमिका केली सखाराम भावे यांनी. सुरुवातीला त्यांच्या हालचालीत अतिरेकीपणा वाटला परंतु नंतर ते चांगलेच रुळले. गिरिजा पेंढारकरने लहानशाच भूमिकेत भरपूर टाळ्या घेतल्या. भालचंद्र पेंढारकरांचा कथेकरीबुवा मात्र निष्प्रभ वाटला. या भूमिकेला विशेष वाव नाही हे खरे असले तरी त्यांचे नाटकाच्या सुरुवातीचे आख्यान फार लांबते. तीच ती वाक्ये येऊ लागली.

दोन कामे लक्षात राहिली. एक अरविंद देशपांडे यांचा देवराज व सुकुमार यांचा साधू. रंगभूमीवर या दोघांना काही मिनिटेच काम होते परंतु त्यांतही त्यांनी आपला ढंग दाखविला.

' झाला अनंत हनुमंत 'ची मूळ कल्पना एका लेखकाच्या कथेवरून घेतलेली आहे असे म्हणतात. ती कल्पना तेंडुलकरांइतकी चांगली दुसऱ्या कोणाला वापरता आली असती किंवा नाही याची शंका आहे. मराठीतील नाटककारांमध्ये तेंडुलकरांचे घराणे वेगळे आहे. वाङ्मयीन, मनोविश्लेषणाच्या दृष्टीने त्यांची नाटके वैशिष्ट्यपूर्ण, उच्च दर्जाची असतात परंतु त्यांना व्यवहारी यश मात्र येत नाही. आपल्या नाटकाला व्यवहारी यशही यावे हा मुद्दा मनात ठेवून तेंडुलकरांनी ' झाला अनंत हनुमंत 'चे शेवटचे दोन अंक लिहिले की काय अशी शंका येते. तेंडुलकर घराण्याने मधुसूदन कालेलकर किंवा गोखले घराण्याशी असा आपला संबंध जोडू पाहिला आहे. परंतु व्यवहारी घराण्यांच्या ' गायकी 'चे आडाखे वेगळे असतात. तेंडुलकर घराण्याच्या गळ्यातून ते सूर बाहेर पडणे कठीणच. तेंडुलकरांनी त्या पातळीवर प्रयत्न करणेही त्यांच्या प्रतिभेला न शोभणारे. पब्लिकला मात्र ' झाला अनंत हनुमंत ' ची झेप न पेलणारी.

चालायचेच. चांगली कलाकृती आणि लोकप्रियता भिन्न मार्गाने जातात हेच खरे.

—अशोक जैन

# चि त्र प ट

**कथानक :** गडगंज धनसंपदा, तीन चिरंजीव, आणि दोन सुना, एवढी ऐहिक बंधने मागे ठेवून सरंजामे देवाघरी जातात. दमडा मिळवण्याची अक्कल नसलेली ही मंडळी पूज्य पिताजींनी रक्ताचे पाणी करून मिळवलेली मालमत्ता उदार हस्ते उधळत असतात. घराण्याच्या खोटया वैभवापायी घर बुडण्याची पाळी येते. बिचारा इमानदार मुनीम–पंत सरंजाम्यांचे घर वाचवण्याची खटपट करतो. या खटपटीचा एक भाग म्हणून एका गरीब कीर्तनकाराची लक्ष्मी नामक सुंदर कन्या आणि आपले धाकटे मालक विनायक यांचा विवाहही पंत घडवून आणतात. खोटया प्रतिष्ठेला बळी पडणाऱ्या या मंडळींचे घर सावरण्याची जबाबदारी नव्याने आलेल्या अन्नपूर्णेवर येऊन पडते. गाडी रुळावर येण्याच्या बेतात असताना अन्नपूर्णा बाळंतपणासाठी माहेरी जाते. आतापर्यन्त सरळ वागणारा नारायण–बाबूराव (थोरल्या बंधूंचा निरुद्योगी मेव्हणा) बाईच्या माडीचे उंबरठे झिजवू लागतो. मधले चिरंजीव रेस सारखे शोक करू लागतात. थोरले 'दादा' धर्मराजाचा अवतार असल्याच्या थाटात वावरू लागतात.

## थांब लक्ष्मी . . . . . . . . . .

□

□

## रडू येईल तितके रडावे अन्यथा गृही परतावे

बाळाला घेऊन आलेली अन्नपूर्णा घरातील लक्ष्मी घरात राहण्यासाठी आत्मबलिदान करते. आणि मग मंडळी शुद्धीवर येऊन सुखाने नांदू लागतात.

**समीक्षण :** महादेवशास्त्री जोशी यांची मूळ कथा. पटकथा-संवादाचा साज दत्ता केशव यांचा. हा साज चढवताना त्यांनी मूळ कथेची 'मद्रास फिल्मी स्टोरी' करून आणि यच्चयावत स्त्रीप्रेक्षकांना भरपूर रडवून रुमालांची ओली फडकी करण्यास पूर्ण संधी दिली आहे. कथेतील तीन मुख्य पात्रांच्या स्वभावपरिवर्तनास कोणतीही तर्कशास्त्रीय कसोटी नाही. लेखकाला वाटले की पात्र चांगले वागू लागते त्याची मर्जी खप्पा झाली की पात्र वाईट चालीचे बनते. साध्या सरळ सामाजिक

पातळीवर चालणाऱ्या स्टोरीमध्ये साक्षात लक्ष्मीदेवतेला पाचारण करून आपण भलतेच थ्रिल निर्माण केले आहे अशी लेखकाची समजूत असावीसे वाटते.

निर्जीव पात्रांची लेखककथित कहाणी असे स्वरूप असल्याने, असे का ? असा प्रश्न विचारण्यास पूर्ण मज्जाव आहे.

**तांत्रिक :** अशी ही कथा निर्माते दत्ताराम गायकवाड यांनी स्त्री प्रेक्षकांची नाडी ओळखणाऱ्या दत्ता धर्माधिकारी यांच्या दिग्दर्शनाखाली रुपेरी पडद्यावर आणली आहे. सर्व चित्रपटावर नाटकी अवकळा आहे. या नाटकी टेकिंगचे उत्तम उदाहरण म्हणजे सर्व बंधू विषप्राशनाचा प्रयोग करतात, आणि मध्येच लक्ष्मी येऊन हा उपक्रम थांबवते ते दृश्य. घरातील दृश्ये बघत असताना ही पद्धत विशेष तीव्रतेने जाणवते. गीताच्या ठेक्यावरोबर बाबूरावच्या सिगरेटीतून निघणाऱ्या धुराची लय साधून एक वेगळी गंमत दिग्दर्शकाने निर्माण केली आहे. बाह्य चित्रीकरण जास्त वास्तव झाले आहे. सर्वसाधारणपणे मराठी चित्रपटामध्ये आढळणार नाहीत, इतकी चांगली तांत्रिक अंगे या चित्रपटामध्ये पाहावयास मिळतात. विशेष गौरव केला पाहिजे तो दीनानाथ चव्हाण यांच्या सेट्सचा. त्यांची निर्मिती पुष्कळच स्वाभाविक वाटली. छायालेखक सूर्यकान्त लवन्दे व ध्वनिलेखक बाबा लिंगनूरकर यांनीही उत्तम कामगिरी बजावली आहे.

नृत्याची हाताळणी विशेषत: दुसरे नृत्य, नृत्याचा हेतू साध्य व्हावा अशा पद्धतीने केली आहे.

प्रभाकर जोग यांनी खेबुडकरांच्या गीतांना सुंदर न्याय दिला आहे. सर्व गीते श्रवणीय वाटतात. विशेषत: कथेतील गोडी नाहीशी झाल्यावर निदान मी तरी गीतांची वाट पाहत बसलो होतो. मिकार चित्रेही गाण्यावर चालतात, मराठी चित्राला अद्यापि तो अनुभव नाही. 'घेऊ कसा उखाणा ? का लाजले अशी मी, माझे मला कळेना' हे लताच्या गोड गळ्यातून उतरलेले गीत उत्तम आहे.

**अभिनय :** जयश्रीबाईंवर (लक्ष्मी–अन्नपूर्णा) चित्रपटाची मदार. बाई कामही या पद्धतीच्या चित्रपटांना हवे त्याच पद्धतीने करतात. अन्य पात्रांत चित्तरंजन कोल्हटकर (बाबूराव), चंद्रकान्त गोखले (पंत), बऱ्याच दिवसांनी दिसलेले विवेक (दादा) चांगले वाटतात. ज्याचा उल्लेख केला नाही, त्यांची कामे वाईट झाली आहेत असे मात्र नव्हे.

**दर्जा** – सामान्य

**शरद गोखले**

# तुमचे भविष्य आमचा अंदाज

श्री. गो. जोशी, सायनाचार्य

## २ ते ८ मार्च राशि–भविष्य

**मेष :** शनि-मंगळ युती (३ मार्च) याच आठवड्यात घडून येणार आहे. पण त्य योगामुळे काही अस्मानी सुलतानी घडून येईल ही भीती मनातून काढून टाका. दर २।२ वर्षांनी असे योग अंतरिक्षात नेहमीच घडत असतात. एवढे मात्र घडेल की, आपल्या प्रगतीच्या घोडदौडीला थोडी खीळ बसेल. इष्टमित्रांचे सहकार्य पूर्वीसारखे मिळेनासे होईल. वाढत्या खर्चामुळे काही काळ हतबुद्ध व्हाल. प्रकृतीच्या बारीकसारीक तक्रारी काही काळ जाणवू लागतील. यापेक्षा अधिक काहीच घडणार नाही; पण गुरू तुमच्या पाठीशी उभा आहेच की, तो निर्माण होणारे सारे पेचप्रसंग सोडविण्यास तुम्हास सतत साहाय्य करील. थोडेसे सावधगिरीने वागलात तर लक्षात घेण्यासारखे काहीही अनिष्ट घडणार नाही.

दि. ६ ते ८ मार्च काही अनुकूल घटना घडाव्यात.

**वृषभ :** अनेकांना क्लेशदायक वाटणारा शनि-मंगळ तुम्हाला काहीसा अनुकूलच ठरेल. आपली व्यावसायिक बाजू या काळी मजबूतच ठरेल.

मित्र-हितचिंतकांची सहानुभूती मात्र फारशी लाभेल या भरवशावर राहू नका. थोरांची अभिवचनेही या वेळी साफ खोटी ठरतील. येणारा पैसा योग्य वेळी हाती न आल्यामुळे तुमच्या कार्याची गती थोडीफार मंदावेल. या शनि-मंगळांमुळे जे काही अनिष्ट घडून येणार असेल ते एवढेच. याच कालात परराष्ट्रीय संबंध घनिष्ठ बनू लागतील, उद्योगधंद्यात अभिनव तंत्राचा वापर करण्याचे ठरेल. आणि त्यामुळेच तुमच्या नोकरी-धंद्यात काही अनन्यसाधारण असे घडून यावे.

दि. ५ ते ७ या कालावर अधिक लक्ष द्या.

**मिथुन :** या वेळी तुमच्या हातून अशा काही चुका घडू लागतील की, त्यामुळे वरिष्ठांची सहानुभूती गमावून बसाल, पण त्यामुळे फारसे काही बिघडेल असे मात्र नाही. सूर्य भाग्यस्थानी, गुरू तृतीय स्थानी, हेच तुमचे खरे हितचिंतक. ते तुम्हाला कशाचीही उणीव भासू देणार नाहीत.

मोठमोठ्या जबाबदाऱ्यांचे ओझे उचलावे लागेल, आणि त्या जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडण्यासाठी जिवाचे रान करावे लागेल.

या कालात आपणास फारच परिश्रम करावे लागतील. आणि त्यामुळे थोडाफार प्रकृतीवर ताण पडेल. पण अपयशाची भीती यत्किंचितही बाळगू नका. घरच्या वडील मंडळींचे आरोग्य एकाएकी बिघडेल. स्थावराचा प्रश्नही चिघळेल.

२।४।८ तारखांना अपेक्षा बऱ्याच प्रमाणात सफल होतील.

कर्क : जीवनात महान क्रांती घडवून आणण्याचे सामर्थ्य शनि-मंगळातच असते. आणि त्यांचे आगमन भाग्यस्थानी घडून आलेले असल्यामुळे, या आठवड्यातच आपली हयात उजळून काढणाऱ्या अनंत प्रगत घटना भराभर घडून येतील.

तुमच्या जीवनातील हा एक चिरंतन स्मृतीचा काळ ठरेल. जे आजवर जिवाचे रान करूनही कधी घडू शकले नाही ते या वेळी क्षणार्धात घडून येऊ शकेल. शनि-मंगळांचे सामर्थ्यच असे आहे. त्यांच्या मनात एखादी गोष्ट करायची असे आले की, त्यांना मग धीर नाही, विलंब नाही.

रासायनिक संशोधनक्षेत्रात काही अलौकिक कार्य घडेल, कला साहित्यक्षेत्रातही आवाज उठवण्याचे जमू लागेल. सामाजिक, राजकीय क्षेत्रांत तर तुमच्याविना पान हालेनासे होईल.

मार्च ३।५।७ या कालांची नोंद ठेवा.

सिंह : अष्टमात श. मं. रा. ही ग्रहस्थिती अनुकूल तर नाहीच. उलट प्रतिकूलतेचे झटके काही काल तीव्रपणाने अनुभवावे लागतील. या वेळी एकच एक आशास्थान सिंहेचा गुरू. तो आणीबाणीच्या वेळी सहकार्याचा हात पुढे करील, काही विपरित घडू नये म्हणून डोळ्यात तेल घालून तुमची पाठराखण करीत राहील. या वेळच्या ग्रहस्थितीचा आरोग्यावर थोडाफार परिणाम होईल. व्यवसाय-धंदा, पैसा-अडका आणि प्रतिष्ठा यांबावत चिंता करण्यासारखे काहीही, केव्हाही घडणार नाही.

तुम्हा सिंह राशी व्यक्तींचं सामर्थ्य अपार आहे. तुमच्या बुद्धीची खोली अगाध आहे. आणि कर्तृत्व तर विलक्षण धारदार आहे. अशा माणसावर हे अनिष्ट ग्रह यत्किंचितही परिणाम करू शकणार नाहीत. क्षणकाल वैचारिक आंदोलने उठतील एवढेच.

दि. ७।८ मार्चपासून अनपेक्षितपणे लाभदायक घटना घडू लागतील.

कन्या : या आठवड्यात घडून येणाऱ्या शनि-मंगळ युतीचा अधिकाधिक अनिष्ट परिणाम कन्या राशी व्यक्तीवरच होण्याची शक्यता आहे. व्यावसायिक मतभेद चिघळू लागतील, कौटुंबिक संघर्ष तीव्र स्वरूप धारण करू लागतील, आणि भागीदार तर कोणत्याही क्षणी विरोधी पवित्रा घेतील.

अशा काळी सरळ सरळ माघार घेणे हा एकच शहाणपणाचा उपाय. तुमच्यातील अहंकारी प्रवृत्तीला मुरड घातली नाही तर मोठा चमत्कारिक प्रसंग ओढवेल.

व्यापारी अंदाज साफ चुकतील, आराखडा फसेल, लक्ष्मी रुसेल, सहकार्य बे-

भरवशी ठरतील. या ८।१५ दिवसांत कोणतेही साहस करण्यास उद्युक्त होऊ नका जुळतेमिळते घेण्याची प्रवृत्ती ठेवलीत तरच वेळ निभावला जाईल.

५ ते ८ प्रवास घडेल, घावपळ होईल.

**तूळ :** या वेळी अनेक ग्रह अनुकूल असूनही अपेक्षेप्रमाणे काहीच घडू शकणार नाही. षष्ठातील मंगळ-शनींचा आवेग इतका मोठा आहे की, ते तुमच्या कार्यात पावलोपावली अडीअडचणीचा डोंगर उभा करतील.

प्रत्येक पाऊल पुढे टाकण्यापूर्वी १० वेळा विचार करायला हवा. अप्रतिष्ठा, अपेक्षाभंग असं काही घडणार नाहीच पण स्वास्थ्य उडेल, पैसा अपुरा पडेल, वाहनाचे सहकार्य लाभणे कठीण.

थोरामोठ्यांचे सहकार्य घेतल्याशिवाय तुमच्या भव्य कार्यक्रमात यश लाभणे कठीणच.

दूरचा प्रवास टाळा, दीर्घ मुदतीचे कराररमदार करू नका. मंगलकार्यांचे निश्चित ठरवू नका.

दि. ७।८ मार्चपासून थोडाफार आशादायक काल जाणवू लागेल.

**वृश्चिक :** सध्याची ग्रहस्थिती वाईट नाही पण अपेक्षेप्रमाणे चांगली आहे या भ्रमात मात्र राहू नका. एकमेकांशी सदैव हाडवैर करणारे हे ग्रह आज अगदी गळचात गळा घालून बसलेले दिसत असले तरी त्यांचा आंतरिक हेतू काही निराळाच असेल. म्हणून मला आपणास असे आवर्जून सांगावेसे वाटते की, सध्याच्या शनि-मंगळ युतीच्या कालात भावनेच्या आहारी जाऊन काहीच करू नका. नित्य नैमित्यिक कार्यक्रमात काही अडथळे येणार नाहीत. नोकरी-धंद्यातही काही बिघाड होऊ शकणार नाही हे खरे असले तरीही या वेळी प्रत्येक गोष्ट जरा जपूनच. पुन्हा मोठा धरणीकंप होण्याची भीती नाही पण आंतरिक खळबळ उडविणाऱ्या गोष्टी केव्हाही होतील.

फार मोठे साहस करू नका. नव्या व्यवसायधंद्याला प्रवृत्त होऊ नका.

दि. ३ ते ५ मार्च, काही कामे झटपट होतील.

**धनू :** अंतरिक्षातील सारे उग्र ग्रह सुखस्थानी. त्यांच्याशी जरा जपूनच वागा. ते केव्हा काय करतील हे सांगताच येणे कठीण. एकटा भाग्यस्थ गुरू यांच्यापुढे निष्प्रभ ठरेल. मुख्यतः प्रकृति-अस्वास्थ्य आणि स्थावराच्या कटकटी निर्माण करण्याचा त्यांचा रोख दिसतोय. तुमचा अन्नधान्याचा फायदा त्यांना घेता येऊ नये यासाठी सतत सावध राहा.

सांपत्तिक ताण कमालीचा जाणवेल, नोकरी धंद्यात मतभेदाची वावटळे उठू लागतील, सांसारिक जीवनात वैचारिक संघर्ष निर्माण होईल. अंगीकृत कामे गतिहीन बनू लागतील. प्राप्ती घटेल, खर्च सहस्रमुखांनी वाढू लागेल. आणि या सर्व हल्ल्यांना एकदम तोंड द्यावे लागणार असल्याने तुमची तारांबळ उडणे साहजिकच

चवथी सचित्र आवृत्ती

□□

# राजा शिवछत्रपति

□□

ब. मो. पुरंदरे

□□

मूल्य : रुपये बेचाळीस फक्त

□□

राजहंस प्रकाशन
पुणे

आहे. या आठवड्यात जबाबदारीचे असे काहीही करू नका.

दि. ५ ते ८ थोडेफार अनुकूल दिवस.

**मकर :** श. मं. रा. यांपैकी एखादा ग्रह जरी पराक्रमस्थानी आला तरी तो तुमच्या यशाची ग्वाही देऊ शकतो. या वेळी तर हे तीनही समर्थ ग्रह तेथे आलेले असल्यामुळे तुम्हांला आकाश ठेंगणे वाटू लागेल. वरचेवर प्रवास घडेल, धावपळीने अनेक कार्यक्रम यशस्वी केले जातील, या वेळी मित्र तर मदत करतीलच पण शत्रूही तुमच्या साहाय्यास कोणत्याही क्षणी धावून येतील.

असीम महत्त्वाकांक्षी व्यक्तींना हीच एक महान पर्वणी आहे. ही वेळच अशी महत्त्वाची आहे की, या वेळी काहीही करायला उद्युक्त व्हावे आणि ते घवघवीत यश घेऊन उठावे असा पदोपदी साक्षात्कार घडून यायला लागेल.

या वेळी दूरचा प्रवास घडेल, काहींना परदेशास जाण्याची संधी लाभेल, नव्या व्यवसायक्षेत्रात पाऊल पडेल, अनेकांचे सहकार्य न मागताही लाभेल.

मार्च ३ ते ६ या कालाची नोंद ठेवा. अनन्यसाधारण यश मिळेल.

**कुंभ :** या आठवड्यातील शनि-मंगळ योगामुळे फारसे बिघडेल असे नाही, पण मनःस्वास्थ्य हरवल्यासारखे सतत जाणवेल. बारीकसारीक तक्रारी, कौटुंबिक मत-भेद, सहज काही बोलावे आणि ते दुसऱ्याच्या जिव्हारी लागावे असे काही प्रकार या वेळी सतत जाणवतील आणि त्यामुळे मन बेचैन बनेल. एका गुरूच्या भरवशावरच तुम्हाला हा सारा काल यशस्वीपणाने निभावून न्यावा लागणार आहे.

दंत, नेत्र विकारांची विशेष काळजी घ्या. पैशाअडक्याचे व्यवहार फारच सावधपणाने हाताळा. व्यवसायधंद्याचे जुने तंत्र थोडेफार बदलल्याशिवाय गत्यंतर नाही याची जाणीव प्रकर्षाने होऊ लागेल. सामाजिक क्षेत्रात विशेष भाग घेऊ नका.

७।८ मार्चपासून अनुकूल व आशादायक काल.


**मीन :** सध्याचे दिवस मोठे कंटाळवाणे जाणवायला लागतील. प्रकृती आणि स्वास्थ्य या दृष्टीने मनाला हुरहूर लागेल. मनात प्रखर आणि स्फोटक विचार घोळू लागतील. ही वेळच अशी चमत्कारिक आहे की, कितीही शिकस्तीचा प्रयत्न केलात तरी अपयश, अपेक्षाभंग याशिवाय काहीच पदरी पडणार नाही.

मुख्यतः या वेळी प्रकृतीची विशेष दक्षता घ्या. व्यवहार-धंद्यात अवश्य ती दक्षता बाळगली नाही तर फार मोठी फसवणूक होण्याचा संभव आहे.

जबाबदाऱ्यांचे ओझे उचलू नका. अधिक परिश्रम करू नका. या काळी शांतता, मौन व संयम यांचीच नितांत गरज भासेल.

दि. ६–७–८ या काली आपल्या परिश्रमाचे फल थोडे फार पदरी पडावे.

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd. No M H-649




राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर.**